कर्नाटक सरकार

# माय-मराठी

## मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक

## Marathi First Language

### Part - 2

# 8

## इयत्ता आठवी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**Karnataka Textbook Society (R)**
**6th Cross, Malleshwaram,**
**Bengaluru - 560 003.**

# अनुक्रमणिका

D3W6A1



| अ.क्र. | पाठाचे / कवितेचे नाव | साहित्य प्रकार | लेखक/कवी | पृ.क्र. |
|---|---|---|---|---|
| 13. | माझी मुक्ताई | विभूती गौरव | बहिणाबाई चौधरी | 1 |
| 14. | कर्नाटकातील काही शिल्पसुंदर स्थळे | प्रवास वर्णन | कृ.ब. निकुम्ब | 5 |
| 15. | भाषा बांधव्य | लेख | डॉ संध्या देशपांडे | 11 |
| 16. | भाऊराया | लोकगीत | त | 17 |
| 17. | तीन मुद्दे | वैचारिक लेख | विनायक नरहर भावे | 19 |
| 18. | माय | दलित कविता | वामन निंबाळकर | 22 |
| 19. | आलोकाबाईस पत्र | पत्र लेखन | संत गाडगेमहाराज | 25 |
| 20. | गोपाळकाला | पंडिती काव्य | प्रल्हाद शिवाजी बडवे | 30 |
| 21. | शनिवार वाड्यात कात्रजचे पाणी | बखर वाङ्मय | कृ.वि. सोहनी | 34 |
| 22. | संत वाणी | प्राचीन काव्य | कान्होपात्रा शेखमहंमद | 38 |
| 23. | म्हाईंभटी शिक्षापणी | प्राचीन गद्य | म्हाईंभट | 42 |
| | व्याकरण, लेखन, शब्दसंग्रह | | | 47 |



* **अशी खूण असलेल्या कविता पाठांतरासाठी आहेत**

अज्ञा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 13. माझी मुक्ताई

Q2L3D3

- बहिणाबाई चौधरी

**कवी परिचय :-**

बहिणाबाई चौधरी (1880-1951) एक अशिक्षित कवयित्री. जीवनातील विविध अनुभव समर्थपणे कवितेतून व्यक्त केले. जिव्हाळ्याची बोली हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य. जळगाव येथे शेतकरी कुटुंबात आयुष्य गेल्यामुळे त्यांच्या लेखनात खानदेशी व वऱ्हाडी भाषेचा वापर झाला आहे. (या भाषेत 'ल' बद्दल 'य' चा वापर आढळतो). 'बहिणाबाईंची गाणी' हा कविता संग्रह प्रसिद्ध. त्यातील ही कविता आहे.

मुक्ताई ही ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण. ती दहा वर्षाची तरी पण उपजत ज्ञानामुळे चांगदेवाची गुरू झाली. आपल्या रागावलेल्या मोठ्या भावाची (ज्ञानेश्वराची) समजूतही तिनेच काढली. अशा या मुक्ताईचे भावपूर्ण चित्रण या कवितेत केले आहे.

*(मूल्य - विभूती गौरव)*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

माझी मुक्ताई मुक्ताई
दहा वर्साचं लेकरू
चांगदेव योगीयानं
तिले मानला रे गुरु ।।1।।

अरे संन्याशाची पोरं
कोनी बोलती हिनई
टाकी देयल पोरांचं
कधी तोंड पाहू नही ।।2।।

अरे असं माझं तोंड
कसं दावू मी लोकाले
ताटी लाई ग्यानदेव
घरामधी रे दडले ।।3।।



उबगले ग्यानदेव
घडे असंगाशी संग
कयवयली मुक्ताई
बोले ताटीचे अभंग ।।4।।

घेती हिरीदाचा ठाव
ऐका ताटीचे अभंग
एका एका अभंगात
उभा केला पांडुरंग ।।5।।

गह्यरले ग्यानदेव
डोये गेले भरी सन
असा भाग्यवंत भाऊ
त्याची मुक्ताई बहीन ।।6।।

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| वर्साचं | - वर्षाचं | हिनई | - हिणवीत |
| टाकी देयेल | - टाकून दिलेल्या | ठाव | - ठिकाण |
| योगी | - योग विद्येचा अभ्यास केलेला | उबगले | - कंटाळले |
| हिरीदाचा | - हृदयाचा | कयवयली | - कळवळली |
| उभा केला | - साकार केला | भरिसन | - भरून |
| गह्यरल | - गहिवरले | असंगाशी संग | - वाईट माणसाशी संबंध |
| ताटी | - दार | दडले | - लपले. |

**टीप :-**

1) चांगदेव - योग साधना केलेला ज्ञानी पुरुष. त्यांना स्वतःबद्दल गर्व होता. ज्ञानदेवाना भेटण्यासाठी वाघावर बसून आला होता. पण मुक्ताईच्या ज्ञानाने प्रभावित होऊन त्याने तिला गुरु मानले.

2) ताटीचे अभंग - ज्ञानेश्वर रागावून दार बंद करून स्वतःला कोंडून घेऊन बसले. त्यावेळी त्यांची समजूत काढून दार उघडण्यासाठी मुक्ताईने केलेले अभंग.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) मुक्ताई ही कोण होती?
2) मुक्ताईला गुरू कोणी मानले?
3) मुक्ताईचे वय किती होते?
4) ज्ञानदेव घरात का दडले?

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) ज्ञानेश्वर भाग्यवंत आहेत असे बहिणाबाई का म्हणते?
2) मुक्ताईच्या अभंगाचा ज्ञानदेवावर कोणता परिणाम झाला?

**प्र3. खालील प्रश्नाचे चार-पाच वाक्यात उत्तर लिहा.**

1) मुक्ताईबद्दल बहिणाबाईनी कोणते गौरवोद्‌गार काढले आहेत?

**प्र4. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) मुक्ताईने ज्ञानदेवांची समजूत कशी काढली?

**प्र5. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा**

1) माझी मुक्ताई मुक्ताई दहा .............. लेकरू
2) उबगले ग्यानदेव घडे ..............संग
3) ताटीचे अभंग .............. चा ठाव घेतात
4) मुक्ताईचा .............. हा भाग्यवंत भाऊ होय

**प्र6. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) चांगदेव योगीयान तिले मानल रे गुरु.
2) त्याची मुक्ताई बहीन.

**भाषाभ्यास :-**

पुढील शब्दांचा वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) असंगाशी संग
2) कळवळणे
3) तोंड न पाहणे

**उपक्रम :-**

1) कनकदास, पुरंदरदास, अल्लम प्रभू या संताची माहिती मिळवून लिहा.
2) संत नामदेवांनी लिहलेले समाधी हे प्रकरण वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 14. कर्नाटकातील काही शिल्पसुंदर स्थळे

K9F7B4

**- प्रा. कृ.ब. निकुम्ब**

**परिचय :-**

**कृ. ब. निकुम्ब (1920-1999)**

कृष्णाजी बलवंत निकुम्ब हे बेळगावी येथील लिंगराज कॉलेजात मराठीचे प्राध्यापक होते. मूळचे नाशिकचे. शालेय व कॉलेज शिक्षण नाशिक येथे झाले. त्यांचा 'उज्वला' हा पहिला कवितासंग्रह 1945 साली प्रसिद्ध झाला. त्याच्या प्रतिमेला शांततेचे वातावरण, सृष्टीचे रम्य, उदास, शांत असे स्वरूप मानवते. उर्मिला हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह, आधुनिक काव्यरचनेचे भावगीत, सुनीत, कणिका, मुक्तछंद, गझल, ओवी वगैरे काव्यप्रकार त्यांच्या या संग्रहात आढळून येतात. त्याची काव्यरचना निर्दोष व शब्दरचना अभिप्रेत अर्थाची अभिव्यक्ती करणारी अशीच असते. मानवतेच्या कल्याणाची त्यांची तळमळ त्यांच्या कवितेत व्यक्त झालेली अहे. उज्वला, उर्मिला, अनुबंध, अभ्र, पंखपल्लवी, सायसाखर हे त्यांचे काव्यसंग्रह आहेत.

प्रस्तुत प्रवासवर्णन उतारा 'लाटा आणि लहरी' या पुस्तकातून घेतला आहे. या पाठात विजयापुराच्या प्रेक्षणीय स्थळांचे व तेथील शिल्प सौंदर्यांचे वर्णन केले आहे.

*(मूल्य-कुतूहल)*

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

'गुलाब म्हटले की, आपल्या डोळ्यासमोर गुलाबी रंगाचे फूल उभे राहते. ते सुरेख असते, सुवासिक असते. चांगले डौलदारही असते. मात्र गुलाब म्हटल्याबरोबर आपल्याला अगोदर काही जाणवत असेल, तर त्याचा तो मोहक गुलाबी रंग! पण माणसाचे केवळ एकाच गुलाबी रंगावर समाधान झाले आहे काय? छे! त्याने कलमे केली. नाना प्रकारचे प्रयोग केले आणि मग तऱ्हेतऱ्हेचे गुलाब त्याच्या बागेत डोलू लागले. पांढरा गुलाब, पिवळा गुलाब, मोतिया रंगापासून तो लालबुंद रंगापर्यंतच्या आणि फिक्या पिवळ्यापासून तो धुंद केसरीपर्यंतच्या शेकडो छटांचे गुलाब माणसाने तयार केले. फुलांच्या एखाद्या प्रदर्शनात तर तपकिरी, गडद जांभळ्या रंगांचे गुलाबही आढळतात आणि सहज पाहाण्यात येत नसला तरी हिरवा गुलाबही असतो! पुनः या गुलाबांच्या आकारांचे तरी किती प्रकार सांगावे! याचा अर्थ असा की, सौंदर्य माणसाला आवडते खरे, पण तेच सौंदर्य तऱ्हांतऱ्हांनी वेगवेगळेपणाने अनुभवण्यात त्याला विशेष आनंद होतो. सौंदर्याच्या विविधतेतला आनंद वेगळाच!

चित्रकला, संगीतकला, शिल्पकला या सौंदर्य निर्माण करणाऱ्या कलांनाही यामुळेच विविधतेची ओढ लागते. स्वाभाविकच त्यात अनेक पद्धती निर्माण होऊ लागतात आणि आपापल्या वेगळेपणाने

त्या माणसाला लुब्ध करून सोडतात. एका शिल्पकलेचे आंणि तेही केवळ कर्नाटकातील उदाहरण घेतले, तरी शिल्पसौंदर्याचे अनेक प्रकार मी मी म्हणत पुढे येऊ लागतात. निघायचे का शिल्पयात्रेला? निदान त्यातल्या काहींची तरी ओळख करून घेता येईल.

**मुक्काम विजयापुरा :**



या शिल्पयात्रेचा हेतू धरून आपण उत्तरेकडून दक्षिण दिशेच्या रोखाने कर्नाटकात शिरू लागलो की, आधी विजयापुरा जिल्ह्यात उतरतो. खुद्द विजयापुरा शहर हे मुस्लीम शिल्पशैलीचे केंद्र होय. आणि ते तसे नसते तरच नवल! या शैलीत घुमट आणि कमानी यांचे वैभव दृष्टीस पडते. आदिलशाही राजाची विजयापुरा ही राजधानी. साहजिकच या राजानी विजयापुरात तट आणि बुरूज, राजवाडे आणि महाल, मशिदी आणि मनोरे, थडगी, तळी, किल्ले यांची केवळ रेलचेल करून ठेविली आहे. काळाच्या प्रवाहात त्यापैकी कित्येकांची पडझड झाली असली तरी विजयापुरा हे अव्वल दर्जाच्या शिल्पांचे आणि इमारतींचे शहर आहे. याची साक्ष पटविण्यासाठीच जणू काही जुम्मा मशीद, गोलघुमट, इब्राहीम रोजा, मेहेत्तर महल आपापले वेगवेगळे रूप वैभव दाखवीत आजही विजयापुरात उभे आहेत.

**जुम्मा मशीद :**

पहिल्या अली आदिलशहाच्या कारकीर्दीत जुम्मा मशीद बांधली गेली. ती अतिशय प्रचंड आहे. इतकी की, साडेचारशे फूट लांब आणि सव्वादोनशे फूट रूंद. अशा या इमारतीत एकाच वेळी मोजून अडीच हजार माणसांना नमाज पढता येतो. तिच्या भिंतीवर सुवर्णाक्षरांनी कुराण लिहिलेले आहे. तिचा घुमट, तिच्यातली मोजकीच कलाकुसर या साऱ्यांचा असा एक तोल साधला

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

गेला आहे की, ती प्रचंड असूनही अस्ताव्यस्त वाटू नये!

**इब्राहीम रोजा :**

गोलघुमट विजयापूराच्या एका टोकाला तर इब्राहीम रोजा बरोबर त्याच्या उलट टोकाला. रचनेतही या इमारती अशाच एकमेकांच्या अगदी विरुद्ध आहेत. भव्यता आणि साधेपण हे गोलघुमटाचे विशेष, तर टुमदारपण आणि बारकाईची कलाकारागिरी ही इब्राहीम रोजाची आकर्षणे होत.



इब्राहीम रोजा ही इमारत अशी ठायी ठा दुसऱ्या कोणत्याही आदिलशाही इमारतीत इतकी कलाकुसर नाही. तिच्या रचनेतला आणखी एक चमत्कार सांगण्यासारखा आहे. अनेक चौकोनी फरशीसारख्या दगडानी तिचे सपाट छत घडविलेले आहे. पण त्या चौकोनी दगडांना कोणताही आधार दिलेला दिसत नाही! शिल्पकलेतल्या जाणत्या मंडळीना हे कोडे अजूनही सुटलेले नाही! हीच जाणती मंडळी असेही म्हणतात की, आग्राचा प्रसिद्ध ताजमहाल बांधणाऱ्या कारागिरांनी ताजचा आराखडा तयार करताना, इतर इमारतीबरोबर इब्राहीम रोजाही नक्कीच विचारात घेतला असावा! या इमारतीच्या कलात्मक सौंदर्याचा हा मोठाच गौरव होय.

**गोलघुमट :**



गोलघुमट अशा सौंदर्याचे दर्शन घडविण्यासाठी बांधला गेलेला नाही! पाहणाऱ्याला थक्क करून सोडावे. आश्चर्यचकित होऊन त्याने भान विसरावे. हाच जणू काही या रचनेचा हेतू असावा! महंमद आदिलशहाने ही इमारत स्वतः च्या चिरनिद्रेसाठी बांधविली. ती अतिशय विस्तृत आणि ठसठशीत आहे. या चौकोनी इमारतीची प्रत्येक बाजू दोनशे पाच

फूट आहे. तिच्या चारही कोनांना सातमजली, अष्टकोनी मनोरे इमारतीला अगदी चिकटून बांधलेले आहेत. इमारतीची उंची तिचा भव्य घुमट आणि तिची प्रमाणबद्धता दुरूनही नजरेत भरते. खाली एकच एक चौकोनी दालन आहे. बाजूच्या मनोऱ्यातून वर-खाली जा-ये करण्यासाठी वाटोळे जिने आहेत. जिन्यातून धापा टाकत, विसावा घेत वर गेल्यावर आपण घुमटाच्या वर्तुळाकार क्षितिजाला लागून असलेल्या सज्जात प्रवेश करतो.

गोलघुमट ज्या प्रतिध्वनीच्या चमत्कारासाठी प्रसिद्ध आहे तो चमत्कार येथेच घडतो. तेथे शब्द उच्चारायचा अवकाश लागोपाठ त्याचे पडसाद उमटू लागतात. या सज्जातल्या भिंतीकडे तोंड करून पुसट आवाजात बोलावे. बरोबर समोर सज्जात उभ्या असलेल्या व्यक्तीला ते तंतोतंत ऐकू येते. मधले अंतर आहे एकशे चोवीस फुटांचे!

खालच्या भव्य पोकळीत पाहावे तर दृष्टी फिरते. वरच्या तितक्याच भव्य घुमटाकडे पाहावे तर घाबरल्यासारखे होते. आजूबाजूला साद-पडसादांचा समुद्र उसळलेला असतो आणि आपण आश्चर्याने केवळ स्तब्ध होऊन गेलेलो असतो. गोलघुमट हा प्रतिध्वनीचा चमत्कार तर खराच. पण साधेपणा, ठसठशीतपणा, भव्यपणा यांच्या कमालीच्या सुसंगतीमुळे तो शिल्परचनेतलाही एक चमत्कारच होऊन बसला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**मेहेतर महाल :**



मेहेतर महाल हा खरोखर महाल नाही. ते केवळ एका लहानशा मशिदीच्या भोवती असणाऱ्या बागेचे एक शोभिवंत प्रवेशद्वार आहे. अवघ्या चोवीस फूट विस्ताराची ही इवलीशी इमारत; तिचे नाजूक मिनार आहेत पन्नास फूट उंचीचे, पण हे सगळे एवढे नीट आणि देखणे की, पाहात राहावे, पाहातच रहावे. तर आवडली ना तुम्हाला ही शिल्प सौंदर्य स्थळे? तर तुम्हीही एकदा जावून या बरं विजापूरला.

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | |
|---|---|---|---|
| डौलदार | - दिमाखदार, ऐटदार | सुरेख | - सुंदर |
| मोहक | - आकर्षक | लुब्ध होणे | - मोहित होणे |
| शिल्पकला | - दगडावरील कोरीव काम | शिल्पसौंदर्य | - दगडातील कोरीव सौंदर्य |
| वैभव | - ऐश्वर्य, सुबत्ता, संपन्नता, श्रीमंती | मनोरे | - शिखराकडे निमुळता होत जाणारा व |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | आतून पोकळ असा उंच खांब, मिनार |
| रेलचेल | - | मुबलक, भरपूर | नमाज | - | मुस्लिमांची प्रार्थना |
| सुवर्णाक्षर | - | सोन्याची अक्षरे | कलाकुसर | - | नाजुक नक्षीचे काम |
| सुबक | - | छोटे पण देखणे | कोडे | - | रहस्य, गुप्त गोष्ट |
| जाणती मंडळी | - | ज्ञानी माणसे, जाणकार लोक | गौरव | - | बहुमान, मानसन्मान |
| दालन | - | कक्ष विभाग | अव्वल | - | उत्तम, प्रथम दर्जाचे |
| क्षितिज | - | आकाश जमिनीला टेकल्यासारखे वाटते ती जागा, आकाश व जमीन यांची सीमारेषा | चिरनिद्रा | - | कायमची झोप |
| | | | वाटोळे | - | गोलाकार, चेंडूसारखे |
| | | | साद | - | हाक, बोलविणे, आवाज |
| पडसाद | - | प्रतिध्वनी, एकाच आवाजाचे अनेक आवाज उमटणे | विसावा | - | आराम, विश्रांती |
| | | | तंतोतंत | - | अचूक, जसेच्या तसे, मिळते जुळते |
| सज्जा | - | इमारतीच्या बाहेरच्या बाजूला काढलेला कठडा | सुसंगती | - | चांगली संगत. |
| आराखडा | - | नकाशा, रूपरेषा | सुवासिक | - | सुगंधित |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) गुलाब म्हणताच कोणत्या रंगाचे फूल डोळ्यासमारे उभे रहाते?
2) उत्तरेतून दक्षिणेत जाताना कर्नाटकात प्रथम कोणत्या जिल्ह्यात उतरतो?
3) विजयापूराची जुम्मामशीद कोणाच्या कारकिर्दीत बांधली गेली?
4) इब्राहीम रोजा ही इमारत कशाने नटली आहे?
5) महंमद आदिलशहाने गोलघुमट कशासाठी बांधविला?
6) गोलघुमट कशासाठी प्रसिद्ध आहे?
7) मेहेतर महल म्हणजे काय?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन ते तीन ओळीत लिहा.**

1) तऱ्हेतऱ्हेचे गुलाब मानवाच्या बागेत कसे डोलू लागले?
2) सौंदर्य निर्माण करणाऱ्या कला कोणत्या आहेत?
3) विजापूरात कोणत्या गोष्टीची रेलचेल करून ठेवली आहे?
4) इब्राहीम रोजा बद्दल जाणती मंडळी काय म्हणतात?
5) गोलघुमटात कोणता चमत्कार घडतो?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) गुलाबाच्या वेगवेगळ्या रंगांचे वर्णन करा.
2) जुम्मा मशिदीबद्दल माहिती लिहा.
3) गोलघुमटाच्या भव्यतेची माहिती लिहा.

**प्र4. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1) विजयापुरा शहर हे .................. शिल्पशैलीचे केंद्र आहे.
2) जुम्मामशिदीत एकाच वेळी .................. माणसांना नमाज पडता येतो.
3) टुमदारपणा आणि बारकाईची कलाकारगिरी ही .................. आकर्षण होत.
4) फुलांच्या एखाद्या प्रदर्शनात तर तपकिरी गडद जांभळ्या रंगाचे .................. आढळतात.

**प्र5. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) आदिलशाही राजाची विजयापुरा ही राजधानी.
2) मधले अंतर आहे एकशे चोविस फूट.

**प्र6. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| 1) इब्राहिम रोजा | अ) प्रतिध्वनी चमत्कार |
| 2) गोलघुमट | ब) अली आदिलशहा |
| 3) मेहेतर महल | क) ठायीठायी कोरीवकाम |
| 4) जुम्मा मशिद | इ) आदिलशहाची राजधानी |
| 5) विजयापुरा | ई) शोभिवंत प्रवेशद्वार |

**प्र7. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) इब्राहिम रोजा, गोलघुमट या इमारतींचे सविस्तर वर्णन करा.

**उपक्रम :-**

1) विजयनगर (हंपी) या स्थळाला भेट देऊन तेथील मूर्ती पहा.
2) 'चीनी माती' हे वीणा प्रभूंनी लिहिलेले प्रवास वर्णन मिळवून वाचा.

*********

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 15. भाषा बांधव्य

I8Q6U7

- डॉ.संध्या देशपांडे

**परिचय :**

प्रा.डॉ.संध्या देशपांडे ह्या बेळगाव मधील आर.पी.डी महाविद्यालयात मराठी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. गेली अनेक वर्षे बेळगावमधील विविध सामाजिक संस्थाशी त्यांचा घनिष्ट संबंध आहे. नाट्यक्षेत्रात त्यांचे भरीव कार्य आहे. दिग्दर्शन, अभिनय, लेखन यामध्ये त्यानी भरपूर काम केलेले आहे. कादंबरी, नाटक, काव्य आणि अनुवाद इत्यादी साहित्य प्रकार त्यानी हाताळाले आहेत. आजन्मा, आक्रित, अकल्पित, वॉज आय रॉंग या एकांकिका, अश्वदा ही कादंबरी 'अंतस्थ' हे नाटक, 'आजन्मा मदन' हे दीर्घकाव्य तसेच स्वरगंगा, हे चरित्र ही त्यांची साहित्यसंपदा आहे. वस्त्रद यांच्या मानवतावादी बसवण्णा व बसवेश्वरांच्या वचनांचा त्यानी अनुवाद केला असून चंद्रशेखर कम्मार यांच्या 'सिरीसंपिगे' या नाटकाचा त्यानी 'चाफा' हा अनुवाद केला आहे. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

***मूल्य - भाषाबंधुता***

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाषेचा इतिहास हा त्या भाषिक लोकांच्या सभ्यतेचा इतिहास मानला जातो. वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या दोन शेजारी प्रदेशांत परस्परांच्या भाषांचा प्रभाव ही स्वाभाविक गोष्ट आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र हे ही दोन शेजारी असणारे प्रदेश. त्यामुळे या दोन प्रदेशांचे एकमेकांशी भाषिक, सांस्कृतिक, राजकीय व भौगोलिक संबंध असणे स्वाभाविकच आहे. कै.शं.बा. जोशी मराठी व कानडी जुळी भावंडे मानतात. बा.कृ. गलगली हे कानडी ही मराठीची आक्का (थोरली बहीण) असल्याचे म्हणतात. महाराष्ट्रावर कर्नाटकाचा भाषिक व सांस्कृतिक दृष्ट्या प्रभाव पडण्याचे मुख्य कारण दीर्घकाळ कन्नड राज घराण्यांचा महाराष्ट्रवर असलेला अंमल होय, असे रं.शा.लोकापूर प्रतिपादन करतात.

भाषिक दृष्ट्या कानडी आणि मराठी या दोन्ही भाषेत शब्द, म्हणी, वाक्प्रचार या बाबतीत पुष्कळ साम्य असल्याचे दिसून येते. नाते संबंधाच्या बाबतीत कानडीतून आक्का (थोरली बहीण), आण्णा (मोठा भाऊ), आप्पा (वडील) असे शब्द आपण घेतले. दोन्ही भाषेत अनेक समानार्थी म्हणी आहेत. उदा.- आधी पोटोबा मग विठोबा (मोदलिगे होट्टेयप्पा, आमेले विट्टप्पा), नाचता येईना अंगण वाकडे (कुणियलिक्के बरलिल्ला अंगळ डोंकु), दात आहेत तर चणे नाहीत अन चणे आहेत तर

दात नाहीत (हल्लु इद्दाग कडली इल्ल, कडली इद्दाग हल्लू इल्ल).

सण आणि उत्सव यांतूनही कानडी मराठी भाषिकात एक तरल अनुबंध दिसून येतो. महाराष्ट्रात गुढी पाडवा हा सण चैत्र महिन्यात साजरा केला जातो कर्नाटकातही हाच सण युगादी पाड्डु या नावानी साजरा केला जातो. दोन्ही प्रदेशात कडुनिंबाचे सेवन, पंचांगश्रवण, नवीनवस्त्रे धारण करणे, पक्वान्नाचे भोजन या प्रकारे सण साजरे करण्यात येतात.

चैत्रातच रामनवमीचा उत्सव महाराष्ट्र आणि कर्नाटकात उत्तम प्रकारे साजरा होतो. म्हैसूर बेंगळूरु भागात  शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करून हा सण साजरा केला जातो. नागपंचमी, गोकुळाष्टमी, श्रावणातील शुक्रवारी वरदमहालक्ष्मी, हे सण येतात. महाराष्ट्रात गोकुळाष्टमी खूप उत्साहात साजरी होते. बेंगळूरु भागातही कृष्णाष्टमी म्हणून हा उत्सव साजरा केला जातो. महाराष्ट्रातील हरितालिका कर्नाटकात सुवर्ण गौरी म्हणून साजरी होते. महाराष्ट्र, कोकण भागात या दिवशी स्त्रिया व्रत ठेवून उपवास करतात. मात्र कर्नाटकात सूप वाण म्हणून देतात. सुग्रास भोजन करतात. दोन्ही प्रेदशात गणेशोत्सव साजरा होतो तसा देशात अन्यत्र कोठेही होत नाही. तुमकूर तिपटूर, अरसिकेरे येथेही गणपतीच्या मोठमोठ्या मूर्ती करून त्याची, स्थापना केली जाते असे सरस्वती रिसबूड सांगतात. म्हैसूरच्या दसऱ्याचे देशविदेशातील लोकाना आकर्षण वाटत आले आहे. दोन्ही प्रदेशात दिवाळी साजरी केली जाते. संक्रांतीला कर्नाटकात संक्रमण हब्ब म्हणातात. महाराष्ट्रात होळी, रंगपंचमी साजरी करतात. धारवाड हुब्बळ्ळी भागात कामदहन होते रती कामण्णाच्या मूर्ती बनवून त्याची पूजा केली जाते. स्नेहभाव वृद्धिंगत करणारे हे सण आणि उत्सव दोन्ही प्रांतात सारख्याच आनंदाने व उल्हासाने साजरे होतात.

कन्नड व मराठी संतांमध्ये ही समानता असलेली दिसते. कन्नडचे भक्तश्रेष्ठ पुरंदरदास व मराठीचे संत एकनाथ हे समकालीन होते. समवयस्क होते. एकनाथांचा नातू, मुक्तेश्वर यानी श्रेष्ठ कन्नड कवी कुमारव्यासांच्या व्यासभारताचा मराठी अनुवाद केला आहे. लोकभाषेत साहित्य निर्मिती हे दोन्ही भाषातील संतांचे वैशिष्ट्य. महात्मा बसवेश्वर म्हणजे तर महाराष्ट्र कर्नाटक यांच्या अतूट अनुबंधाचा एक सेतूच होय. पंढरपूरची वारी म्हणजे परस्पर विचार विनिमयाचे, सहकार, भावनेचे उत्तम उदाहरण आहे. 'दासरेंदरे पुरंदरदास' म्हणून दास साहित्यात पुरंदरदास यांना ओळखले जाते, तर 'तुका झालासे कळस' अशी तुकाराम महाराजांची ख्याती आहे. विठ्ठल हे दोन्ही लोकांचे आराध्य दैवत होते. गुरूचरित्र लिहिणाऱ्याची भाषा कानडी होती. दत्तोपासना ही या दोन प्रांताना जोडणारा दुवा आहे.

ज्ञानदेवांच्या मराठीवर जसा कानडीचा प्रभाव आहे तसाच कुमारव्यासांच्या भारतावर मराठीचा

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रभाव आहे वीर, शौर्य, सामर्थ्य, विस्तार, जान अशा शब्दाना त्यानी 'पण' हा मराठी प्रत्यय लावून वीरपण, जाणपण असे शब्द आपल्या काव्यात योजले आहेत.

कन्नड नाट्यपदांचा मराठी नाट्यगीतावर प्रभाव पडलेला आहे. तसेच मराठी कादंबरी वाङ्मयाचा कन्नड कादंबरी वाङ्मयावर प्रभाव पडला आहे. मराठीतील दलित साहित्य व कन्नड मधील बंडाय साहित्याचा अनुबंधही सर्वश्रृत आहे. गळगनाथ म्हणाजे व्यंकटेश तिरको कुलकर्णी यांनी कमलकुमारी या नावाने'गड आला पण सिंह गेला' या ह.ना.आपटे यांच्या कादंबरीचा अनुवाद केला. आपट्यांच्या वज्राघात, उषःकाल, सूर्योदय, अफझलखान वध या कादंबऱ्या कर्नाटकातही लोकप्रिय होत्या.

कर्नाटकाला आठ ज्ञानपीठ पुरस्कार मिळाले. त्यापैकी डॉ. कारंथ, मास्ती, बेंद्रे, गोकाक, कुवेंपु हे नवोदय काळातले लेखक. यातल्या कारंथ, बेंद्रे, गोकाक यांच्यावर महाराष्ट्राचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसतो. बेंद्रे यांची मातृभाषा मराठी होती. शिवराम कारंथ यानी अगदी तरूण वयातच 'एकच प्याला' या गडकऱ्यांच्या नाटकाचा 'निशा महिमें' हा कन्नड अनुवाद केला होता. चि.त्र्यं. खानोलकरानी हयवदन या कर्नाडांच्या नाटकाचा अनुवाद केला. डॉ. शिवराम कारंथ, गोरूरू रामस्वामी अय्यंगार यानी मराठी भाषा येत नसतानाही इतरांच्या मदतीने मराठी कादंबऱ्यांचे, नाटकांचे कानडी अनुवाद केले. उमा कुलकर्णी यांनी सुधामूर्ती, अनंतमूर्ती, एस.एल.भैरप्पा अशा अनेक साहित्यिकांच्या कृतींचे अनुवाद करून हा साहित्यिक अनुबंध दृढ केला आहे.

भारतरत्न पं. भीमसेन जोशींच्या संतवाणीने मराठीच्या सांस्कृतिक जीवनात एक इतिहास निर्माण केला आहे. एकदा पु.ल.देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' या नाटकाचा बेंगलोरला प्रयोग होता आणि त्याचे अध्यक्ष होते मास्ती व्यंकटेश अय्यंगार. मध्यंतरात पु.लं.चा सत्कार करताना त्यानी पु.ल.ना मिठी मारली आणि त्यांच्या गालाचा मुका घेतला. पु.ल.ना हे सर्वात मोठ बक्षीस वाटलं होतं.

असा हा साहित्यिक, सांस्कृतिक अनुबंध पूर्वापार चालत आला आहे. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार स्वाक्षरी मागायला आलेल्या विद्यार्थांना 'बहुभाषिक व्हा' असा संदेश देत. विनोबा भावे याना तर सोळा भाषा उत्तम येत असत. जागतिकीकरणाच्या या काळात सर्वच भारतीय भाषांवर फक्त ओळखीची खूण म्हणून उरण्याची वेळ आली आहे. अशावेळी भाषा बांधव्य जपून आपल्या भारतीय भाषा वृद्धिंगत करण्याचे प्रयत्न आपण केले पाहिजेत.

NOT TO BE REPUBLISHED
© KTBS

**संदर्भग्रंथ**

भाषाभगिनी - संपादक श्रीपाद गणपती भट

मिथक आणि नाटक - डॉ. तारा भावळकर

महाराष्ट्र कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध - संपादक - डॉ.अ.रा.तोरो

**शब्दार्थ व टीपा**

अनुबंध - संबंध

पूर्वापार - पूर्वीपासून

ख्याती असणे - प्रसिद्धी असणे

स्वाक्षरी - सही

सर्वश्रुत - सर्वांनी ऐकलेले

**टीपा**

1) शं.बा. जोशी- लेखक, समीक्षक, कानडी व मराठी दोन्ही भाषांचे जाणकार

2) रं.शा. लोकापूर- कानडी लेखक, नाटककार, कादंबरीकार, समीक्षक, ज्ञानेश्वरीच्या कानडी अनुवादाचे कर्ते.

3) गळगनाथ- मूळ नाव व्यंकटेश तिरको कुलकर्णी. ह.ना. आपट्यांच्या अनेक कादंबऱ्यांचा अनुवाद त्यांनी कानडी मधून केला. ट्रेनिंग कॉलेज मध्ये शिक्षक. टिळकांच्या केसरी चे चहाते, सद्‌बोधचंद्रिके. नावाचे मासिक ते चालवत.

4) चि. त्र्यं. खानोलकर- मराठीतील गाजलेले कवी, नाटकाकार, कादंबरीकार, आरती प्रभूया नावाने काव्यलेखन.

5) दत्तोवामन पोतदार- सुप्रसिद्ध इतिहास संशोधक उत्तम वक्ते. महामहोपाध्याय ही त्यांना महाराष्ट्राने दिलेली मानाची उपाधी होती.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र1. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1. शं.बा. जोशी मराठी व कानडी या भाषाना काय म्हणतात?
2. महाराष्ट्रावर कानडीचा प्रभाव पडण्याचे मुख्य कारण कोणते?
3. गुढी पाडवा हा दिवस कर्नाटकात कोणत्या नावाने साजरा होतो?
4. संक्रांतीला कर्नाटकात काय म्हणातात?
5. द.रा.बेंद्रे यांची मातृभाषा कोणती होती?
6. कन्नड व मराठीचे कोणते संत समकालीन होते?
7. पु.ल.देशपांडे यांच्या कोणत्या नाटकाचा बेंगळूरु येथे प्रयोग झाला?
8. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार विध्यार्थ्यांना कोणता संदेश देत?

**प्र2. खालील वाक्यातील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1. आधी पोटोबा ....... विठोबा.
2. दात आहेत तर....... नाहीत अन ....... आहेत तर दात नाहीत.
3. महाराष्ट्रात ....... उभारण्याची जी पद्धत आहे ती कर्नाटकात नाही.
4. ....... म्हणाजे व्यंकटेश तिरको कुलकर्णी
5. डॉ. शिवराम कारंथ यांनी अगदी तरूण वयातच....... या गडकऱ्यांच्या नाटकाचा अनुवाद केला.
6. विनोबा भावे यांना....... भाषा उत्तम येत असत.

**प्र3. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1. या पाठातील दोन्ही भाषेतील समानार्थी म्हणी सांगा.
2. गुढी पाडवा दोन्ही प्रांतात कसा साजरा केल जातो?
3. कुमारव्यासांच्या व्यासभारताचे वर्णन या पाठात कसे आले आहे?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र4. खालील प्रश्नांची पाचते सहा वाक्यात उत्तरे द्या.**

1. सर्वात मोठे बक्षीस  मिळाल्याचा आनंद पु.ल.देशपांडे यांना केव्हा झाला?
2. हरितालिका व गणेशोत्सव दोन्ही प्रांतात कसे साजरे केले जातात?

**प्र5. जोड्या जुळवा.**

| | |
|---|---|
| 1. एकनाथांचा नातू | जुळी भावंडे |
| 2. मराठी व कानडी | थोरली बहीण |
| 3. अक्का | मुक्तेश्वर |
| 4. अण्णा | कन्नडचे भक्तश्रेष्ठ |
| 5. पुरंदरदास | मोठाभाऊ |

**प्र6. खालील प्रश्नांची उत्तरे सात ते आठ वाक्यात लिहा.**

1. कन्नड मराठी संतांमधील समानता या पाठातून कशी व्यक्त झाली आहे?
2. या पाठातील अनुवाद साहित्याची माहीती द्या.
3. दोन्ही प्रदेशातील सण उत्सवाचे चित्रण या पाठातून कसे आले आहे ते सांगा.

**प्र7. संदर्भासहीत स्पष्टीकरण करा.**

1. कन्नड व मराठी संतांमध्येही समानता असलेली दिसते.
2. ज्ञानदेवांच्या मराठीवर जसा कानडीचा प्रभाव आहे तसाच कुमारव्यासांच्या भारतावर मराठीचा प्रभाव आहे.

**प्र8. उपक्रम:**

1. विविध भागातील ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या साहित्यिकांची यादी तयार करा.
2. पुरंदरदास व तुकाराम महाराज यांची माहिती मिळवा.

❇❇❖❇❖❇❖❇❇

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 16. भाऊराया

X3P3K6

'लोकगीत' हे मराठी भाषेचं लेणं आहे. ही लोकगीते लोकांनी रचली आहेत. आपल्या उत्कट भावना साध्या सोप्या शब्दात विशेषतः स्त्रियांनी व्यक्त केल्या आहेत. आपापले संसार करताना जे मनोभावाने अनुभवले ते स्वाभाविकपणे या गीतात उमटले आहे. ज्यातून नागपंचमीची, गौरीची, मंगळागौरीची, दिवाळीची, भोंडल्याची, लग्नाची, माहेरच्या आठवणींची अशी अनेक लोकगीते जन्माला आली आहेत.

खालील लोकगीतात भाऊबीजेच्या दिवशी बहीण आतुरतेने भावाची वाट पाहते आहे. तो येत नाही तेव्हा तिच्या मनात कोणते विचार येतात. ते या लोकगीतात पहा. इतर लोकगीतांप्रमाणे याही लोकगीताचे कवी अज्ञात आहेत. हे लोकगीत जुन्या पाठ्य पुस्तकातून घेतले आहे.

*(मूल्य - बंधुप्रेम)*

दादा बालपणी । तुझा चावा मी घेतला
त्याचा काय राग आला । आज तुज ।।
दाणे भातुकलीचे । खाशी म्हणून बोलले
तेच काय मनी धरिले । आज दादा ।।
अपराध पोटी । प्रेम थोरांचे घालीत
येई धावत धावत । भाऊराया ।।
पाठच्या बहिणीवरी । भाऊ कसा रागावेल
चंद्र आग का ओकेल । काही केल्या ।।
पाठच्या बहिणीवरी । भाऊ कसा हो संतापेल
कस्तुरी का सोडील । निज वास ।।
पाठच्या बहिणीवरी । भाऊ कसा हो रूसेल
कधी सोने का कुसेल । काही केल्या ।।
पाठच्या बहिणीवरी । भाऊ का रागावेल
रंग का बदलेल । आकाशाचा ।।



**शब्दार्थ आणि टीपा :-**

निज - स्वतःचा
अपराध - गुन्हा, चूक
कुसेल - कुजेल
संताप - राग.
भातुकली - लहानपणी खेळला जाणारा खेळ, यात स्वयंपाक करतात. राग प्रेम सारे काही खोटे खोटे असते.
कस्तुरी - हरिणाच्या बेंबीत असणारी एक सुगंधी कातडी गाठ

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) दादाला राग का आला असावा?

2) दादा कसा येईल?

**प्र2. खालील प्रश्नाचे उत्तर तीन-चार वाक्यात लिहा.**

1) दादा न येण्याची कोणकोणती कारणे बहिणीच्या मनात येतात?

**प्र3. खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा.**

1) भाऊ रागवणार नाही हे दाखविण्यास बहिणीने कोणकोणती उदाहरणे दिली आहेत?

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) पाठच्या बहिणीवरी । भाऊ कसा हो रूसेल

**प्र5. रिकाम्या जागा भरा.**

1) येई ...................। भाऊराया

2) पाठच्या ...................। भाऊ कसा हो रूसेल

3) रंग ...................। आकाशाचा

**प्र6. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) या कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

**प्र7. जोड्या जुळवा.**

| | अ | ब |
|---|---|---|
| 1) | भातुकली | सुवास |
| 2) | कस्तुरी | कुजणार नाही |
| 3) | बाळपणी | आग ओकणार नाही |
| 4) | चंद्र | दाणे खाल्ले |
| 5) | सोने | चावा घेतला |

**उपक्रम :-**

1) तुमच्या गावात म्हटली जाणारी अशा प्रकारची लोक गीते जमवा.

2) हस्त नक्षत्रात खेळल्या जाणाऱ्या भोंडल्याची (हादग्याची) गाणी जमवा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 17. तीन मुद्दे

P7T9C3

**- आचार्य विनोबा भावे**

**परिचय :-**

विनायक नरहर भावे (1895 - 1982) सुप्रसिद्ध विचारवंत, तत्त्वज्ञ व भाष्यकार, स्वातंत्र्य सेनानी, गांधीवादी विचार सरणीचे विचारवंत व भूदान चळवळीचे प्रणेते. भारतरत्न पुरस्काराने सन्मानित 'मधुकर', 'जीवन दृष्टी', 'गीता प्रवचने', 'लोक नीती', इत्यादी विचारप्रवर्तक पुस्तके त्यानी लिहिली. 'आचार्यकुल' स्थापन करून शिक्षणविषयक नवे विचार मांडले.

कोणतेही काम यशस्वी व्हावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण प्रत्येक काम यशस्वी होईलच असे नाही. त्यासाठी काही नियमांचे पालन करावे लागते. प्रत्येक कामात यशस्वी होण्यासाठी कोणती पथ्ये पाळावी लागतात याची माहिती आचार्य विनोबा भावे यानी या पाठात दिली आहे.

हा वैचारिक लेख 'मधुकर' या पुस्तकातून घेतला आहे.

*(मूल्य- श्रमप्रतिष्ठा)*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

कोणतेही काम नीट व्हायचे म्हटल्यावर त्याला तीन गोष्टींची जरूरी असते. पहिली गोष्ट म्हणजे त्या कामातला संपूर्ण वेग साधला पाहिजे. परीक्षेसाठी प्रश्न विचारले जातात. त्यांची उत्तरे ठरलेल्या वेळेच्या आत लिहून झाली पाहिजेत असा नियम असतो. यात वेळ हा महत्त्वाचा मुद्दा आहे. अमुक मैल कूच करून जायचे आहे, एवढाच प्रश्न लष्कराकडे नसतो; तर अमुक वेळेच्या आत अमुक मैल जायचे आहे, असा मुदत-बंदिचा प्रश्न लष्करापुढे असतो. जी गोष्ट लष्कराची तीच कमीजास्त प्रमाणात व्यवहारातल्या सर्व उद्योगांना लागू आहे. रसोई करणारा मनुष्य रसोई चांगली करतो. पण पाच माणसांची रसोई बनवायला त्याला पाच तास लागतात, तर त्याचे रसोई बनवणे निरुपयोगी आहे. काळाच्या प्रवाहात मनुष्य सापडलेला असल्यामुळे त्याला सर्व कामे या प्रवाहाचे धोरण सांभाळून करायची असतात. म्हणून 'वेग साधणे' हा कामातला एक आवश्यक मुद्दा ठरतो.

दुसरा मुद्दा कामातील सफाई किंवा नेटकेपणा. लष्कराचाच दाखला घेतला, तर अमुक मैल अमुक वेळात कूच करून जायचे हे तर झालेच. पण हे कूच करण्याचे काम पद्धतशीर, लष्करी शिस्तीवर हुकूम, टापटीप सांभाळून झाले पाहिजे. पाचापाचांच्या, की चाराचारांच्या जशा ठरल्या असतील, तशा रांगा करून चालले पाहिजे. सर्वांची पावले सारखी पडली पाहिजेत. कोणी मागेपुढे होता कामा नये. असे होईल, तरच त्या कूच करण्याचा उपयोग व्हावयाचा. कामातील सुंदरता साधली नाही, तर काम करून, न करून सारखे होते. सुंदरता किंवा नेटकेपणा हा गुण कामात आल्याने दुधात साखर टाकल्याप्रमाणे काम खुलेल. ज्या कामात नेटकेपणा नाही ते काम निरर्थक

आहे. सुंदरता ही केवळ शोभा नसून तो कामाचा गाभा आहे.

कामात वेग पाहिजे. नेटकेपणा पाहिजे आणि तिसरी गोष्ट ज्ञान पाहिजे. लष्कराने ठरलेल्या वेगात अगदी पद्धतशीर कूच केले आणि ते ठरलेल्या वेळी पोचले सुद्धा; पण ठरलेल्या जागी मात्र पोचले नाही. जाणून काम केले नाही म्हणजे अशी दशा होते. बरोबर नकाशे आखून रस्त्यातील वळणे कोठे कोठे कसकशी सापडावयाची हे ठरवून त्याप्रमाणे कूच केले पाहिजे.

कोणत्याही कामाची ही तीन अंगे आहेत. काम जाणून केले पाहिजे, नेटके केले पाहिजे, वेगाने केले पाहिजे. हे तिन्ही गुण साधले म्हणजे काम साधले. उदाहरणार्थ - लिहिणे केव्हा आले म्हणायचे? जलद, धावत्या हाताने लिहिता आले पाहिजे. 'वाटोळे, सरळ, मोकळे' असे सुंदर लिहिता आले पाहिजे आणि शुद्धलेखनाच्या नियमावर हुकूम शुद्ध लिहिता आले पाहिजे. तसे झाले म्हणजे लिहिणे आले असे म्हणता येईल.

वरील तीन तत्त्वे सर्व कामांसाठी लागू होतात.

**शब्दार्थ आणि टीपा :-**

कूच करणे - जाणे, निघणे, वाटचाल करणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| रसोई | - | स्वयंपाक | धोरण | - | अंदाज |
| नेटकेपणा | - | सुंदरपणा | दाखला | - | उदाहरण |
| खुलणे | - | उठावदार होणे | जाणून | - | माहिती घेऊन, ओळखून |
| दशा | - | अवस्था, परिस्थिती | दुधात साखर पडणे | - | अधिक चांगले होणे. |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) विनोबा भावे यांनी कोणती चळवळ सुरू केली?
2) विनोबानी कशाची स्थापना करून शिक्षण विषयक नवीन विचार मांडले?
3) कामाची तीन स्वतंत्र अंगे कोणती?
4) कामाच्या बाबतीत कोणता नियम असतो?
5) सफाई आणि नेटकेपणा याबाबतीत विनोबाजींनी कोणता दाखला दिला आहे?
6) कामाचा गाभा असे विनोबाजी कशाला म्हणतात?

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी दोन-तीन वाक्यात लिहा.**

1) रसोई बनवणे केव्हा निरुपयोगी म्हणता येईल?

2) लष्करी शिस्त आणि व्यवहार यांचा मेळ विनोबाजींनी कसा मांडला आहे?

3) लिहिणे केव्हा आले म्हणायचे असे विनोबा म्हणतात?

4) सुंदरता ही कामाची शोभा नसून तो कामाचा गाभा आहे असे का म्हटले आहे?

**प्र3. खालील प्रश्नांची प्रत्येकी चार-पाच वाक्यात उत्तरे लिहा.**

1) वेग साधणे हा कामाचा एक आवश्यक मुद्दा ठरतो हे पटवून देताना विनोबांनी कोणती उदाहरणे दिली आहेत?

2) काम करत असताना ज्ञानाचे महत्त्व काय?

3) लेखकाने नेटकेपणाचे महत्त्व कसे सांगितले आहे?

**प्र4. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

1) ................ चा प्रश्न लष्करापुढे असतो.

2) सर्व कामे या प्रवाहाचे ................ सांभाळून करायची असतात.

3) विनोबा भावे यांचे पूर्ण नाव ................ हे होय.

4) शुद्ध लेखनाच्या ................ शुद्ध लिहिता आले पाहिजे.

5) कामात ................ किंवा ................ हा गुण आल्याने दुधात साखर टाकल्याप्रमाणे काम खुलेल.

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) सर्व कामांसाठी लागणाऱ्या तीन तत्वांचे वर्णन करा.

**भाषाभ्यास :-**

**1. पुढील संधी सोडवा.**

1) निरुपयोगी 2) निरर्थक

**2. पुढील वाक् प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

1) कूच करणे. 2) दुधात साखर पडणे. 3) धोरण सांभाळणे.

**उपक्रम :-**

1) समर्थ रामदासानी 'लेखन कसे असावे' याचे मार्गदर्शन 'दासबोधात' केले आहे ते वाचा.

2) शुद्ध लेखनाच्या नियमानुसार रोज पाच ओळी लिहिण्याचा सराव करा.

3) विनोबा भावे यांचा 'मधुकर' हा निबंध संग्रह वाचा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 18. माय

**– वामन सुदामा निंबाळकर**

Z8U4V3

## कवी परिचय

पूर्ण नांव वामन सुदामा निंबाळकर हे ऐन उमेदिच्या वयापासूनच विविध सामाजिक चळवळीत सक्रिय सहभाग घेऊ लागले. 'भीमसंदेश' साप्ताहिकाचे व त्यानंतर सा. प्रबोधन चे त्यानी संपादन केले. साहित्य कला विकास मंडळ, मिलिंद साहित्य परिषद या संस्थांचे संस्थापक सदस्य व अस्मितादर्श चे काही काळ ते संपादक होते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ते सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन मंडळ या नावाच्या संस्थेची त्यानी स्थापना केली. अनेक कविसंमेलनात सहभागी. दलित पँथरचे सक्रीय कार्यकर्ते व त्यासाठी त्यानी तुरूंगवासही भोगला. गावकुसाबाहेरील कविता, अस्मितादर्शची नऊ वर्षे, बौध्दांच्या सवलती आणि पंतप्रधानांचे वक्तव्य व दलित साहित्य : स्वरूप आणि भूमिका ही त्यांची पुस्तके प्रकाशित आहेत. कर्नाटक, गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र या राज्यातील अभ्यासक्रमात त्यांचा साहित्याचा समावेश आहे.

*मूल्य : मातृप्रेम*

जसा दिवस बुडून जाई काळोखाचे राज्य असे
आम्ही बसू दरवाज्यात झोपडीत साधा दिवा नसे

घरोघरी दिवे लागत चुलीलाही जाळ लागे
भाकरी जात बडविल्या कुठे चून कुठे वांगे

नाकात जाई वास त्याचा पोटात असे अंधार सारा
तसे येई भडभडून आसवांच्या डोळ्यात धारा

अंधाराला चिरत तेव्हा एक सावली जड येई
डोई तिच्या भारा असे चालताना तोल जाई

काळी, काळी, कृश देह ती असे माझी माय
वणवण सकाळपासून मोळीसाठी रानात जाय

वाट पहात बसू कधी तिची सारे आम्ही भाऊ
मोळी नसे विकत तेव्हा भुकेलेले झोपी जाऊ

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

एकदा काय कसे झाले  आम्हा काही कळले नाही
माय आली पाय बांधून  भळाभळा रक्त वाही

चावला साप मोठा काळा  दोन बाया होत्या सांगत
फणा काढून मारला त्याने  हळूच गेला निघून रांगत

माय पडली धरणीवर  गंडे झाले, मंत्र झाले वैद आला
दिवस निघता, निघता  तिच्या देहातून प्राण गेला

हंबरडा फोडला आम्ही  तो विरला वाऱ्यावर
माय तरी सोडून गेली  चिल्लेपिल्ले वाऱ्यावर

शोधते माझी नजर माय,  आता मी उदास होतो
दिसता कृश मोळीवाली  मोळी तिची विकत घेतो

**शब्दार्थ-**

चून - झुणका,  भारा - मोळी,  कृश - बारीक,  वैदू - वैद्य

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा**

1. काळोखाचे राज्य केव्हा येते?
2. चुलीला जाळ केव्हा लागे?
3. डोळ्यांत आसवांच्या धारा का लागत?
4. मायचा मृत्यू कसा झाला?
5. माय सकाळपासून वणवण का करत असे?
6. दोन बाया काय सांगत आल्या?
7. मोळीवाली दिसताच कवी काय करतो?

**प्र2. खालील ओळीत रिकाम्या जागी योग्य शब्द भरा**

1. मायला .......... चावला
2. घरोघरी ........... बडविल्या जात

3. ........... वाऱ्यावर सोडून माय निघून गेली

4. आईच्या पायातून ........... वाहात होते

5. झोपडीत साधा ........... नसे

**प्र3 खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा**

1. आईची वाट पाहात मुले दरवाज्यात का बसत असत?
2. मायला साप चावल्याचे कसे कळले?
3. मायवर कोणते उपचार केले गेले?

**प्र4. खालील ओळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा**

1. 'मोळी नसे विकत तेव्हा भुकेलेले झोपी जाऊ'
2. 'दिवस निघता निघता तिच्या देहातून प्राण गेला'
3. 'दिसता कृश मोळीवाली मोळी तिची विकत गेतो'

**प्र5. खाली दिलेल्या प्रश्नांचे उत्तर पाच सहा वाक्यात लिहा**

1. या कवितेत गरीबीचे वर्णन कसे केले आहे?

**प्र6. खालील प्रश्नाचे उत्तर सात आठ वाक्यात लिहा**

1. या कवितेचा सारांश लिहा
2. आईच्या मायेचे वर्णन कवीने कसे केले आहे?

**भाषाभ्यास**

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

हंबरडा फोडणे, भडभडून येणे, वाऱ्यावर सोडणे

**उपक्रम**

'आईचा महिमा' या विषयावर निबंध लिहा

'आई' या विषयावरच्या वेगवेगळ्या कवितांचा संग्रह करा.

**पुढील शब्द असेच लिहा**

| | | |
|---|---|---|
| जगन्मोहिनी | ध्यानमग्न | वर्षप्रतिपदा |
| ज्योतिर्लिंग | पुण्यश्लोक | वर्षाऋतु |

*********

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 19. आलोकाबाईस पत्र

V5C1J3

**- संत गाडगे महाराज**

**परिचय :-**

मुळ नाव 'ढेबुजी झिंगराजी जानोरकर (1876 ते 1956). अमरावती जिल्ह्यातील शेणगाव हे त्यांचे जन्मगाव. आईचे नाव सखुबाई वडिलांचे नाव झिंगराजी. जातीने परीट. वडीलांचे निधन लवकर झाल्याने घरची जबाबदारी ढेबुजींवर पडली. त्यांचा जन्म अतिशय गरीबीत गेला. ते शेती करू लागले. त्याचवेळी शिक्षणापेक्षा त्यांचे मन भक्तीकडे ओढ घेऊ लागले. त्यांनी महाराष्ट्रभर भ्रमंती केली. समाजातील दैन्यावस्था, अंधश्रद्धा, रूढी यात बुडालेल्या समाजाचा उद्धार करावा हे त्यानी निश्चित केले. वृद्धाश्रम, दवाखाने, शिक्षण संस्था व विधवाश्रमही सुरू केले. ग्राम स्वच्छतेवर त्यांचा भर होता. म्हणून ते कायम झाडू हाती बाळगत. त्यांनी अन्नछत्रें घातली. भंडारे (प्रसाद) आयोजित केले. पण स्वतःसाठी भाकरी भिक्षा मागूनच खाल्ली. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नावाने ग्राम स्वच्छता अभियान सुरू केले आहे. अमरावती विद्यापिठास त्यांचे नाव दिले आहे.

श्री. स्वामी महाराज, दीपावली विशेषांक (1987) या अंकातील डॉ. शरदचंद्र कोपर्डेकर यानी लिहिलेल्या 'श्री संत गाडगे महाराज' या कादंबरीतून हे पत्र घेतले आहे. पत्राची भाषा गाडगेबाबांची असली तरी ते स्वतः निरक्षर असल्याने 'गुरुदास ढेमरे' यानी हे पत्र लिहिले आहे. हे पत्र ता. 29/2/1940 रोजी पाठविले आहे.

गोरक्षणाच्या इमारतीत राहणारी गाडगे महाराजांची कन्या व जावई यांच्या मनात स्वार्थ निर्माण झाला. हे समजल्यावर मुलीची कान उघाडणी करण्यासाठी हे पत्र लिहिले आहे.

*(मूल्य-स्वार्थत्याग)*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

''सौ. आलोकाबाईस श्रीगाडगेबाबांचा अनंत कोटीचा नमस्कार. पत्रास कारण की गोरक्षणातून लवकर बाहेर पडाल तर बरे होईल.

तुला पैशाचे पक्के भूत लागले. कमी नाही, तू मेल्याशिवाय ते भूत निघणार नाही. तुला ते न लागावं. पण लागलं. दादाला (अच्युतराव देशमुख, व्यवस्थापक) निरोप सांगावा की पाहुणेबोवाचे (आलोकाबाईचे पती) दोन रुपये बंद करा. पाहुणेबोवा तुझे मालक आहेत. त्यांच्या डोळ्याने दिसत नाही सेवा कर...

तुझ्या पोटी जन्मलेला मुलगा वासुदेवराव तेवढा सुधारला. अजून पक्का नाही. त्याचे वय किती, व तुझे किती? तो सुधारला व तुला सुधारायला बुद्धी नाही....

काल पाहुणेबोवानी न विचारता धर्मशाळेतील खोलीतले सामान काढून खोलीत घुसले. मी नसतो तर ट्रस्टींनी खटला भरून त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले असते. धर्मशाळेतील तांब्यासुद्धा मला उचलता येत नाही. असे ट्रस्ट आहे. तेथे तुमची किंमत कोण करील? दादाला सांग की पाहुणेबोवाला धर्मशाळेत कामाला ठेवू नये. व श्री दादांनी काही देवू नये. तुमच्यावर गोरक्षणाच्या लोकांचा असा प्रेम लागला होता पाहिजे की त्यांनी म्हटले पाहिजे होते की तुम्हाला काय पाहिजे व तुम्ही आमच्या खोलीत रहा. पण तुम्हाला कोणी विचारीत नाही. शहाणे असाल तर तेथे राहू नका...



साधुच्या घरातील माणसे उदार असतात. तुकारामबुवा उदार, तसेच त्यांची मुलेही उदार. कबीर उदार, कमाल उदार. कबीराची बाईही उदार. संत आले कबीराच्या घरी. कबीराने बाईला वाण्याच्या घरी गहाण ठेवले व संताना जेवू घातले. मरता मरता कबीराने मुलाला धर्म सांगितला.

''कबीर कहे कमालको दो बाते लिख दे।
कर साहेब की बंदगी और भुकेकु कुछ दे।''

तुमच्या झोपडीवर एखाद्या महारोग्याला किंवा आंधळ्या-पांगळ्याला जेवू घालून जुनापुराणा एखादा कपडा देवून व आणा दोन आणे हातात देऊन वाटेला लावले आहे काय? असे एक तरी उदाहरण असेल तर मला लिहून कळवावे. तुम्ही गाडगेबाबांच्या घरातील माणसे. गाडगेबाबांजवळ बारा आणे त्याग असेल तर तुमच्याजवळ एक रुपया त्याग असायला पाहिजे. कदाचित गाडगेबाबांनी काही घरात आणले तर तुम्ही म्हणावे लागत होते की आम्हास हे नको घेवून जा. असा त्याग पाहिजे ............ पण तुला पक्के पैशाचे भूत लागले. त्यावर भुतंग होऊन बसली. तीन वेळा झोपडीतील सामान फेकले. मोटार आली होती तेव्हा दाळीचे पोते लहान तू मागितले होते. मी नाही म्हटले . तुला अपमानसुद्धा समजला नाही. यावरून तुला पक्का लोभ लागला. करिता आजपासून कोणाजवळ निरोप सांगशील तर तुझा अपमान होईल. गाडगेबाबांची मुलगी म्हणून यापुढे कोणाला मागू नये व देणाराने देवू नये अशा सर्व जनतेला जाहीर निरोप आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| गोरक्षण | - | गाईंच्या रक्षणासाठी बांधलेली इमारत. |
| आलोकाबाई | - | संत गाडगेबाबांची मुलगी |
| पाहुणेबोवा | - | आलोकाबाईचा पती (फकीरराव) |
| दादा | - | अच्युतराव देशमुख, व्यवस्थापक |
| बंदगी | - | चाकरी, सेवा |
| पक्के | - | ठाम, नक्की, निश्चित |
| ट्रस्ट | - | विश्वस्थ मंडळ |
| ट्रस्टी | - | विश्वस्थ |
| उचलता न येणे | - | आश्रमातील कोणत्याही वस्तूवर अधिकार नसणे असा विश्वस्तांचा नियम, (दंडक) |
| किंमत | - | मान, सन्मान, प्रतिष्ठा |
| साधु | - | संत, सज्जन |
| साहेब | - | मालक, परमेश्वर |
| वाटेला लावणे | - | निरोप देणे, मार्गी लावणे. |
| भुतंग | - | भूतबाधित स्त्री |
| दाल | - | डाळ |
| घुसणे | - | बळजबरीने प्रवेश करणे. |
| खटला भरणे | - | पोलिसात लेखी तक्रार नोंदविणे. |
| उदार | - | मोठ्या मनाचा |
| कबीराची बाई | - | संत कबीरांची पत्नी |
| कुछ | - | काहीतरी, थोडे |
| उद्धार करणे | - | सुधारणा करणे. |
| गहाण | - | गरजेपोटी पैसे घेण्यासाठी त्या बदल्यात मौल्यवान वस्तू ठेवणे. |
| भंडारा | - | महाप्रसादाचे जेवण |
| भूकेकु | - | भूक लागलेल्याला |
| दैनावस्था | - | गरीबी |
| अन्नछत्र | - | मोफत जेवणाची व्यवस्था. |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# स्वाध्याय

**प्र1. खाली दिलेल्या चार पर्यायातून योग्य उत्तर निवडून लिहा**

1) आलोकाबाई या गाडगेमहाराजांच्या कोण होत्या?
   अ) बहीण  ब) पत्नी  क) मुलगी  ड) आई

2) तुला ........ भूत लागले असे गाडगेबाबा म्हणतात.
   अ) पैशाचे  ब) खाण्याचे  क) पाण्याचे  ड) कपड्यांचे

3) गोरक्षणाचे व्यवस्थापक कोण होते?
   अ) पाहुणेबोवा  ब) गाडगेबाबा  क) दादा  ड) वासुदेव

4) कबीराच्या मुलाचे नाव ........... होते
   अ) रहीम  ब) कमाल  क) जमाल  ड) कलाल

**प्र2. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) आलोकाबाईंच्या मुलाचे नाव काय?
2) गाडगेबाबांनी दादांना काय सांगण्यास सांगितले आहे?
3) साधूच्या घरातील माणसे कशी असतात?
4) कबीरांनी संतांना कसे जेवू घातले?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र3. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

1) तू मेल्याशिवाय ..................... निघणार नाही.
2) दादांचे नाव ..................... होते.
3) कर साहिबकी ..................... और भुकेकु कुछ दे.
4) गाडगेबाबांजवळ बारा आणे त्याग असेल तर आलोकाबाईकडे ..................... त्याग असावयास पाहिजेत.

**प्र4. जोड्या जुळवा.**

| अ | | ब |
|---|---|---|
| 1) दादा | अ) | आलोकाबाईंचा पती |
| 2) वासुदेव | ब) | कबीरपुत्र |
| 3) आलोकाबाई | क) | आश्रमाचे व्यवस्थापक |
| 4) पाहुणेबोवा | ड) | आलोकाबाईचा मुलगा |
| 5) कमाल | इ) | गाडगेबाबांची मुलगी |

**प्र5. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) पाहुणेबोवांना पोलिसांच्या ताब्यात देण्याची शक्यता का होती?

2) गोरक्षणाच्या लोकांचे प्रेम संपादन करण्यासाठी आलोकाबाईनी कसे वागण्याचा सल्ला गाडगेबाबांनी दिला?

**प्र6. खालील प्रश्नांची प्रत्येकी चार-पाच वाक्यात उत्तरे लिहा.**

1) साधूच्या घरातील माणसे उदार असतात हे सांगण्यासाठी गाडगेबाबांनी कोणती उदाहरणे दिली आहेत?

**प्र7. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) 'आलोकाबाईस पत्र' या पाठावरून गाडगेबाबांचा स्वभाव कसा होता हे स्पष्ट करा.

**भाषाभ्यास :-**

अ. विरुद्धार्थी शब्द लिही.

1) निश्चित × 2) अपमान × 3) उदार ×

ब. खालील वाक्यप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

1) खटला भरणे

2) उद्धार करणे.

**उपक्रम :-**

1) पंढरपूर येथील गाडगेमहाराजांच्या आश्रमास भेट द्या.

2) बाबा आमटे यांच्या चंद्रपूर जिल्ह्यातील 'आनंदवन' या आश्रमास भेट द्या.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 20. गोपाळकाला

- प्रल्हाद बडवे

**कवी परिचय :-**

प्रल्हाद शिवाजी बडवे (1632 ते 1730) एक साक्षात्कारी संत. पांडुरंगाच्या मंदिराच्या सभामंडपात पूर्वभागी त्यांची समाधी आहे. पांडुरंगाचे मुख्य पुजारी. त्यानी पांडुरंगाच्या पुजेचे रोजचे उपचार वैदिक पद्धतीने सुरू केले. भक्तिवेदांतपर रचना खूप केली आहे. 'अमृतानुभव' या ज्ञानेश्वराच्या ग्रंथाचे संस्कृत समश्लोकी रुपांतर केले आहे. त्यांचे मुख्य कर्तृत्व म्हणजे अफजलखानच्या स्वारीच्या वेळी पांडुरंगाच्या मूर्तीचे त्यानी केलेले संरक्षण होय. आज त्यांची अकरावी पिढी असून आजही त्यांच्या घरी आळंदीला जाणाऱ्या पालख्या त्यांना आमंत्रण देऊन आरती करून मगच पुढे जातात. त्यानी एक काकड आरती लिहिली आहे.

या कवितेचा काव्यप्रकार ओवी आहे. ही कविता 'वाचू आंनदे' या पुस्तकातून निवडली आहे.

*(मूल्य - भक्ती, समानता)*

तयाप्रती विश्वंभर । म्हणे 'शिदोऱ्या आणा रे सत्वर ।
वा रे भुकेलेति फार । आजि उशीर बहु झाला ।।
म्हणे भोज्यांच्या परवडी । सवंगडी आणिती तातडी ।
दही दुधाच्या कावडी । अति आवडी आणिलिया ।।

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



येकी विस्तीर्ण पाहोनि शिळा । सभोंवता गोपाळा ।
मध्यें शोभे घनसांवळा । गोपाळकाला मांडिला ।।
शिदोऱ्या सोडूनि खडकावरी। येकीकडे गोपहारी ।
एकीकडे बैसल्या व्रजनारी । परी सन्मुख हरी सकळांही ।।

गडी म्हणती यदुपती । तुझी आम्ही करूं आथीपाथी ।
जें जें ज्या रुचती । तें तें अर्पिती कृष्णमुखी ।।
एकाएका गुदगुलिया । एक दाविती वांकुलिया ।
मिथ्याच म्हणती गाई चुकलिया । दूरी गेल्या उठा वेगी ।।

एक एकाचि दृष्टि चुकवूनि । शिदोरी खाती चोरूनि ।
एक पळती घेऊनि । दांत विचकोनी दाविती ।।
नवनीत भक्षुनि कौतुके । एक एकाची माखिती मुखें ।
गुरळ्या भरूनि ताकें । टाकिती एक एकावरी ।।

गगनगर्भी सुरश्रेणी । बैसूनिया विमानी।
काळा पाहती नयनी । दिव्य सुमनें वर्षती ।।
म्हणती धन्य धन्य गोकुळजन । धन्य धन्य वृक्ष पाषाण ।
धन्य धन्य ते स्थान । जगज्ञीवन तेथे नांदे ।।

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ आणि टीपा :-**

गोपाळकाला - प्रत्येक गोपाळाची शिदोरी एकत्र करून वाटून घेणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| विश्वंभर | - | श्रीकृष्ण | भोज्य | - | जेवण, पदार्थ |
| परवडी | - | प्रकार | गोपहारी | - | गोपाळांची रांग |
| आथीपाथी | - | आतिथ्य | मिथ्या | - | खोटे, लटके |
| यदुपती | - | श्रीकृष्ण | उच्छिष्ट | - | उष्टे |
| कवळ | - | घास | गुरळी | - | चूळ |
| सुरश्रेणी | - | देवदेवता | घन | - | ढग |
| पाषाण | - | दगड, खडक, कातळ | वृक्ष | - | झाड |
| रुचती | - | आवडणे | | | |

# स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) शिदोऱ्या आणा असे कृष्ण कोणाला म्हणाला?
2) सवंगड्यांनी कशाच्या कावडी आणल्या?
3) गोपाळकाला कोठे मांडला होता?
4) गोकुळवासी स्त्रियांसाठी कोणता शब्द वापरलेला आहे?
5) गोप-गोपींचा अतिथी कोण होता?
6) गोपाळकाला म्हणजे काय?
7) आकाशातून हा सोहळा कोण पहात होते?

**प्र2. प्रत्येक प्रश्नांची दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) ते एकमेकांना कशा प्रकारे वाकुल्या दाखवितात?
2) हा सोहळा पाहण्यासाठी जमलेल्या देवांचे वर्णन कसे केले आहे?

**प्र3. खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा.**

1) गोकुळाला धन्य का म्हटले आहे?

**प्र4. खालील प्रश्नांची प्रत्येकी सात-आठ वाक्यात उत्तरे लिहा.**

1) श्रीकृष्ण व सवंगड्यांच्या भोजनाचे वर्णन करा.
2) श्रीकृष्णाचे आदरातिथ्य गोपगोपिकांनी कसे केले?

**प्र5. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| 1) श्रीकृष्ण | अ) धन्य ते स्थान |
| 2) गोप | ब) विमानातून सोहळा पाहतात. |
| 3) सूर | क) दही दुधाच्या कावडी आणतात |
| 4) गोकुळ | ड) शिदोऱ्या आणण्याची आज्ञा देतो. |

**प्र6. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) जे जें ज्या रुचीती । ते ते अर्पिती कृष्णमुखी
2) दात विचकोनी दाविती.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास :-**

**अ) पुढील संधी विग्रह करून प्रकार सांगा.**

| | संधी | विग्रह | संधी प्रकार |
|---|---|---|---|
| 1) | जगज्जीवन | ...................... | ...................... |
| 2) | नयन | ...................... | ...................... |

**उपक्रम :-**

1) धन्य मी शबरी श्रीरामा हे गीतरामायणातील गीत मिळवून वाचा.

2) वनी खेळती बाळ ते वल्लभांचे । तुरे खोवती मस्तकी पल्लवांचे ।
हा वामन पंडित यांचा 'वनसुधा' मधील उतारा मिळवून वाचा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 21. शनिवारवाड्यात कात्रजचे पाणी

**- कृष्णाजी विनायक सोहनी**

K1Y7K9

**परिचय :-**

कृष्णाजी विनायक सोहनी (1784-1894) बखरकार. 'पेशव्यांची बखर' हा त्यांचा एकमेव ग्रंथ उपलब्ध. उत्तर पेशवाई पाहिलेल्या आणि समकालीन राजकारणात वावरलेल्या या माहितगार लेखकाने पेशवेकुलाची ही जीवनगाथा आत्मीयतेने व समरसतेने लिहिली आहे. ही त्यांची बखर काही प्रमाणात इतिहासाशी सुसंगत आहे. त्या काळातील समाजजीवनाचे रंग या बखरीत दिसून येतात.

हा उतारा 'पेशव्यांची बखर' मधून घेतलेला आहे. त्यात शनिवारवाड्यात कात्रजहून पाणी आणल्याची हकीकत आलेली आहे. त्या काळातील वास्तुविद्या, दूरदर्शीपणा आणि दरबारी बोलण्याचा ढंग यांचे दर्शन त्यातून घडते.

*(मूल्य-विज्ञानदृष्टी)*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

वाडा मोठा मजबूत, बाहेरून तट संगीन, असे असतां पाणी आत चांगले प्यावयाजोगे नाही. या समयीं श्रीमंत नानासाहेब यांचे मनांत आले की, नवें पाणी आत नळ बांधून आणावे अशी मनात मसलत योजून चार चार कोस, पाच पाच कोस सभोंवते कारकून पाणी पाहावयास पाठविले. ते सर्व पाहून माघारी आले. कात्रज गाव इकडे जे गेले होते त्यांनी श्रीमंतास विनंती केली की, ''कातरजेच्या तळ्यात पाणी मुबलक आहे. ते पाणी उन्हाळीदेखील आटावयाचे नाही असे आमचे



कल्पनेने वाटते. मग सरकारचे मर्जीस येईल ते खरे.'' अशी विनंती त्यांची ऐकून खासा स्वारी पाहावयास निघाली. तेथे जाऊन पाणी सरकारांनी पाहिले. ते दिवस उष्णकाळाचे. त्या काळी त्या पाण्याला दहा पाच मोटा अखंड अहोरात्र आठ दिवसापर्यंत चालवून पाहिल्या, परंतु पाणी तसूभर कमी झाले नाही. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन बेत झाला की, येथील पाणी नळ बांधून पुण्यास न्यावे. असा निश्चय होऊन गवंडी, पाथरवट बलावून नळाचे काम लाविले. कातरजेपासून पुण्यात काळे वावरात नळ येई तेथपर्यंत संगीन चिरेबंद नळ बांधून आणिला. तो असा आणिला की, त्या बळातून कातरजेपासून काळेवावर पावेतो घोड्यावर बसून स्वार यावा. असा संगीन नळ चिरेबंदी बांधून आणिला. पुढे लहान केला. त्या समयीं वाड्यात पाणी आणावयाचे ते कसें येते? वाड्याभोवती संगीन तट चिरेबंदी. या वेळेस त्या वाड्याच्या कामावर गवंडी होते त्यास बलावून आणून विचारले की, ''पाणी वाड्यात आणावयाचे त्याची तजवीज कशी करावी?'' तेव्हा गवंडी यानी सरकारास विनंती केली की, ''हा विचार पूर्वीच आम्हास समजला होता. एवढा वाडा बांधतात ते पाणी बाहेरून नवे आणतील असा निश्चय करून गणेश दरवाज्याजवळ बुरूजामध्ये खजिना करून ठेविला आहे.'' असें ऐकताच सरकारची मर्जी खूष होऊन, खजिना पाहून गवंड्यास गाव इनाम दिला. मग पाणी आणून त्या खजिन्यात सोडून वाड्यात पाणी खेळविले.

**(पेशव्यांची बखर)**

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | |
|---|---|---|
| संगीन | - | दगडी, चिरेबंदी, मजबूत |
| कातरज | - | पुण्याजवळ असलेले कात्रज हे डोंगराळ गाव |
| मर्जीस येणे | - | पसंत पडणे |
| खासा स्वारी | - | स्वतः खुद्द (नानासाहेब पेशवे) |
| मोट | - | विहिरीतून पाणी काढावयाचे चामड्याचे साधन. (पूर्वी मोटेच्या सहाय्याने शेतीला पाणी पुरवठा केला जात असे.) |
| तसूभर | - | थोडे देखील |
| नळ | - | पाणी आणावयाचा भुयारी चिरेबंदी मार्ग |
| गवंडी | - | बांधकाम करणारे |
| पाथरवट | - | दगड घडविणारे |
| चिरेबंदी | - | घडीव दगडी बांधकाम |
| पावेतो | - | पर्यंत |
| इनाम | - | बक्षीस |
| तजवीज | - | व्यवस्था, सोय |
| खजिना | - | पाणी साठविण्यासाठी बुरुजात तयार केलेला हौद. |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**टीप :-**

शनिवारवाडा - छ. शाहू महाराजांनी पहिल्या बाजीरावांना पुणे हे गाव इ.स. 1726 मध्ये इनाम दिले. शनिवारवाडा हे पेशव्याचे निवासस्थान. इ.स. 1732 ला त्याची वास्तुशांती झाली. शनिवार वाड्यात कात्रजहून पाणी आणले ते बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे (1740-1761) यानी. शनिवारवाडा हे मराठी राज्यातील एक प्रबळ सत्ताकेंद्र होते.

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) वाड्यात कोणती सोय नव्हती?
2) पुण्याच्या सभोवती कारकून कशासाठी पाठविले?
3) कातरजेपासून कोठपर्यंत नळ आणला?
4) नळ कसा बांधून आणला?
5) खजिना कोठे करून ठेविला होता?
6) गवंड्यास काय इनाम दिले?

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) वाड्यात पाणी आणण्यासाठी श्रीमंत नानासाहेबांनी मनात कोणती मसलत योजली?
2) पाणी पाहावयास गेलेल्या कारकूनांनी श्रीमंताना काय सांगितले?
3) श्रीमंत नानासाहेबांनी कातरज तळ्यातील पाण्याचा अंदाज कसा घेतला?
4) शनिवारवाडा बांधलेला गवंड्यानी कोणती कल्पकता दाखविली होती?

**प्र3. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी चार-पाच वाक्यात लिहा.**

1) शनिवार वाड्यात पाणी आणण्यासाठी श्रीमंत नानासाहेबांनी कोणते प्रयत्न केले?
2) नळ कसा बांधून आणला?
3) शनिवारवाडा बांधलेल्या गवंड्यावर श्रीमंत प्रसन्न का झाले?

**प्र4. खालील प्रश्नांची प्रत्येकी सात-आठ वाक्यात उत्तरे लिहा.**

1) कात्रजच्या तळ्यातील पाणी शनिवारवाड्यात आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे वर्णन करा.
2) शनिवारवाड्यात कायम स्वरूपी पाणी मिळविण्याकरीता कात्रजच्या तळ्याची निवड श्रीमंतानी का केली?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र5. संदर्भासह स्पष्ट करा.**

1) ''मग सरकारचे मर्जीस येईल तें खरे''

2) ''एवढा वाडा बांधतात तें पाणी बाहेरून नवें आणतील!''

**प्र6. खाली दिलेल्या उत्तरातून योग्य उत्तर निवडून लिहा.**

1) वाडा कसा होता.

अ) मजबूत ब) उंच क) रंगीत ड) संगीन

2) वाड्यात कोणती सोय नव्हती.

अ) दिवा-बत्तीची ब) बैठकीची क) भोजनगृहाची ड) पिण्याच्या पाण्याची

3) कात्रजच्या तळ्यात पाणी कसे होते.

अ) दुधासारखे ब) मुबलक क) स्पटिकासम ड) निळे-निळे

4) आठ दिवसांपर्यंत किती मोटा चालवून पाहिल्या

अ) एक-दोन ब) सहा-सात क) दहा-पाच ड) चार-तीन

5) नळ केवढा मोठा होता.

अ) दहा फूट ब) माणूस जाईल असा

क) घोड्यावर बसून स्वार यावा असा. ड) तोफ-गोळा जाईल असा.

**भाषाभ्यास :-**

**अ. खालील उतारा प्रमाण मराठीत लिहा -**

ते दिवस उष्ण काळाचे. त्या काळी त्या पाण्याला दहा-पाच मोटा अखंड अहोरात्र आठ दिवसपर्यंत चालवून पाहिल्या, परंतु पाणी तसूभर कमी झाले नाही. त्या समयीं श्रीमंतांची मर्जी प्रसन्न होऊन बेत झाला की, येथील पाणी नळ बांधून पुण्यास न्यावे.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :-**

1) पुण्यातील पेशव्यांचे प्रमुख ठिकाण असलेला शनिवारवाड्याची माहिती मिळवा.

2) 'शर्थीने राज्य राखलं' ही कॅप्टन बेलवलकर यांची पेशवाईवरील कादंबरी मिळवून वाचा.

# 22. संत वाणी

## I अगा वैकुंठीच्या राया

T9R2D7

**- संत कान्होपात्रा**

**परिचय :-**

महाराष्ट्रातील विठ्ठल भक्तापैकी 'कान्होपात्रा' या एक होत. त्यांचा कालावधी 15व्या शतकाचा आहे. त्यांचा जन्म पंढरपूर जवळील मंगळवेढा या गावी शामा नावाच्या कलावंतीणीच्या पोटी झाला. शामाला वाटे आपल्या मुलीनेही आपल्या प्रमाणेच व्यवसाय करावा. पण कान्होपात्रेस ते आवडत नव्हते. तिने विठ्ठल दर्शनाचा ध्यास घेतला होता. एकूण 23 अभंग तिने लिहिले असून त्यामध्ये विठ्ठल भक्तीची ओढ दिसून येते. हा अभंग 'सकळ संत गाथा' या पुस्तकातून निवडला आहे.

*(मूल्य - भक्ती)*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

अगा वैकुंठीच्या राया।
अगा विठ्ठल सखया ।
अगा नारायणा ।
अगा वसुदेवनंदना ।
अगा पुंडलीक वरदा ।
अगा विष्णू तू गोविंदा ।
अगा रखुमाईच्या कांता ।
कान्होपात्रा राखी आता ।



**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| वैकुंठ | - | विष्णूचे निवास स्थान | राया | - | राजा |
| सखया | - | मित्रा | अगा | - | अरे |
| वसुदेवनंदन | - | श्रीकृष्ण (इथे पांडुरंग) | कांता | - | पत्नी |
| राखी | - | वाचव, रक्षण कर. | | | |

**टीप :-**

कलावंतीण - गाणे गाऊन लोकांचे मनोरंजन करणारी स्त्री

## स्वाध्याय

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) वैकुंठीचा राया कोण आहे?

2) पुंडलीकास वर देणारा कोण आहे?

**प्र2. खालील प्रश्नाचे उत्तर तीन-चार वाक्यात लिहा.**

1) रखुमाईचा कांत कोण आहे? त्याला कोणकोणत्या नावाने बोलावले आहे?

**प्र3. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) कान्होपात्रा राखी आता.

**प्र4. खालील प्रश्नाचे उत्तर पाच-सहा वाक्यात लिहा**

1) वरील कवितेचा अर्थ तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास :-**

समानार्थी शब्द लिहा. कांत- सखा, नंदन- पुत्र

**उपक्रम :-**

1) पंढरपूर येथील कान्होपात्रा समाधी मंदिरास भेट द्या.

2) ज्ञानेश्वरांची पैलतो गे काऊ ही विरहिणी वाचा.

❈❈❖❈❖❈❖❈❈

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# II ऐसे केले या गोपाळे

**- शेख महंमद**

**परिचय :-**

वारकरी पंथातील हे एक कवी होत. संत एकनाथांचे समकालीन. नगर जिल्ह्यातील रुईबाहिरे हे यांचे मूळ गाव. जन्माने इस्लामधर्मीय परंतु वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाने ते प्रभावित झाले आणि काव्य रचना करू लागले.

''योग संग्राम'' हा त्यांचा प्रसिद्ध काव्यसंग्रह आहे.

वरवर दिसणाऱ्या भेदांपेक्षा अंतःकरणात असणारी ज्ञान निष्ठा, निर्मळ भक्तीभावना खरी होय असे सांगणारा हा अभंग 'योग संग्राम' मधून घेतला आहे.

*(मूल्य - भक्ती)*

ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे
काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा
फणसा अंगी काटे । आत अमृताचे साठे
नारळ वरूचा कठिण । परी अंतरी जीवन
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।1।।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**शब्दार्थ आणि टीपा :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सोवळे | - | शुद्ध, पवित्र | ओवळे | - | अशुद्ध, अपवित्र |
| वरूचा | - | वरून | जीवन | - | पाणी |
| अविंध | - | मुसलमान | केतकी | - | केवडा |

**प्र1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) गोपाळाने काय केले?

2) केतकीच्या झाडात काय जन्मते?

**प्र2. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| 1) केतकी | अ) काटे |
| 2) फणस | ब) कलावंतीण |
| 3) कान्होपात्रा | क) केवडा |

**प्र3. खालील प्रश्नाचे तीन-चार वाक्यात उत्तर लिहा.**

1) आपण अविंध असूनही पांडुरंगाची भक्ती करतो हे दाखविण्यासाठी शेख महंमदानी कोणती उदाहरणे दिली आहेत?

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) फणसा अंगी काटे
2) त्याचे हृदयी गोविंद

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ वाक्यात लिहा.**

1) या कवितेचा भावार्थ तुमच्या शब्दात लिहा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भाषाभ्यास :-**

**समानार्थी शब्द लिहा.**

गोपाळ, पाणी, फूल

**उपक्रम :-**

1) 'आम्ही वारिक वारिक' हा सेवा न्हावी यांचा अभंग वाचा.
2) 'झाला महार पंढरीनाथ' हे ग. दि. माडगुळकरांचे भक्ती गीत वाचा.

# 23. म्हाइंभटी सिक्षापणी

**- संपा. वा.ना. देशपांडे**

**(स्मृतिस्थळ)**

W8W9J6

**परिचय :-**

तेराव्या शतकात महाराष्ट्रात उदयाला आलेल्या व विकसित झालेल्या महानुभाव पंथाने चरित्रलेखनाची एक नवी परंपरा मराठीत निर्माण केली. या चरित्रमालेतील अखेरचा ग्रंथ म्हणजे 'स्मृतिस्थळ' होय. महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी ह्याचे पट्टशिष्य भठोबास उर्फ नागदेवाचार्य ह्यांच्या उत्तरायुष्यातील, श्रीचक्रधर-स्वामींच्या निर्वाणानंतरच्या आठवणी व त्यांनी आपल्या स्मरणातून सांगितलेली श्रीचक्रधरांची वचने येथे आलेली आहेत. नागदेवाचार्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूबरोबरच म्हाइंभट, महदाइसा, नरेंद्र इत्यादी लेखक-कवींचे संदर्भ देणारा ग्रंथ म्हणूनही 'स्मृतिस्थळा' ला महत्त्व आहे.

हा ग्रंथ केव्हा व कोणी लिहिला यासंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही. हा ग्रंथ कोणा एका लेखकाचा नसून त्यात अनेकांच्या पाठातील कमी अधिक मजकूर मिसळला गेला असावा असे 'स्मृतिस्थळा' चे संपादक श्री. वा.ना. देशपांडे ह्यांनी म्हटले आहे. नागदेवाचार्यांच्या निधनानंतर (इ.स. 1312) 'स्मृती' चे लेखन झाले असावे.

तेराव्या शतकातील महानुभाव गद्य वाङ्मयात भाषेचे संवादरूप, बोलीतील जिवंतपणा, अल्पाक्षरत्व व शब्दांची लय ह्या वैशिष्ट्यांचे दर्शन घडते. 193 क्रमांकाच्या ह्या स्मृतीत अस्पृश्यता निर्मूलनासंबंधीचा विचार स्पष्टपणे मांडला गेला आहे.

*(मूल्य-अस्पृश्यता निर्मूलन)*

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

कोथळोबा तान्हैलें एकु दिं उमाइसाचीये करवतीयेचे पाणि न पुसत प्याले : तव उमाइसे कोपलीं: तूं शुद्र माझीये करवतीयेचें पाणि का प्यालासि: तवं तें म्हाइंभटी आइकीलें : मग म्हणितलें : हे यैसें काइ उमाइसें : तुम्हा दोहीं देवांचा संबंधुः आणि आबाइसांसारखी माताः भटोबासांसारीखें बंधुः आणि तुमचे आझुनि अज्ञान फिटलें नाहीः आहा यैसें तुम्हा काइ जालें: कोथळेयासारीखें पात्र जर तुमचीये करवतीयेचे पाणि पी तरि तुझें दैव-भाग्य नव्हेः यैसीं सिक्षापीलीं: मग तियें अनुतापलीं: म्हाइंभटीं म्हणितलें : घाला कोथळेयांसि दंडवत : हो कां : मग उमाइसीं कोथळोबासांसी दंडवत घातलें : नेणेंचि वाः चुकलीये पापीणि : ।।शोधुः । मग कोथळोबाने तयांते उठवीलें ।।

**शब्दार्थ आणि टीपा :-**

कोथळोबा - श्री. चक्रधरांच्या परिवारातील एक सामान्य शिष्य.

उमाई - सारंगपंडित पत्नी, चक्रधर शिष्या.

म्हाइंभट - 'लीळाचरित्रा' चा कर्ता, आद्य मराठी चरित्रकार.

करवतीयेचे - (करवती म्हणजे वस्त्राचे केलेले उदकपात्र) त्या पात्रातील.

दोही देवांचा - श्रीगोविंद प्रभू व श्रीचक्रधरस्वामी ह्यांचा महानुभाव पर्याय कृष्णावतार मानतात. म्हणून त्यांचा.

संबंधु - सहवास.

आबाइसा - नागदेवाचार्यांची माता

भटोबास - उर्फ नागदेवाचार्य - श्रीचक्रधरानंतरचा महानुभावपंथाचा प्रमुख अनुयायी व आचार्य

पात्र - व्यक्ती

दैव भाग्य - दुर्भाग्य

सिक्षापीलीं - शिकविले, शिकवणूक दिली, शिकवण.

अनुतापली - पश्चाताप झाला.

शोधु - पाठभेद

## स्वाध्याय

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्र1. पुढील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) महानुभाव पंथाचे संस्थापक कोण होते?
2) कोथळोबा हा कोण होता?
3) उमाइसा का कोपली?
4) म्हाइंभटानी उमाइसेस कोणती आज्ञा केली?
5) उमाइसा कोणाला माता आणि बंधु मानित होती?
6) कोणत्या दोन देवांचा संबंध उमाइसाला घडला असे म्हाइंभट म्हणतात?

**प्र2. खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) म्हाइंभटानी उमाईसेस कोणता उपदेश केला?
2) उमाइसेस पश्चाताप का झाला?
3) या पाठाच्या आधारे महानुभाव पंथाची शिकवण लिहा.

**प्र3. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर पाच-सहा ओळीत लिहा.**

1) उमाइसेने कोथळोबाला दंडवंत का घातले?
2) म्हाइंभटाना उमाइसेच्या वागण्याचे आश्चर्य का वाटले?

**प्र4. संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

1) ''तू शूद्र माझीये करवतीयेचे पाणि का प्यालासिः''
2) ''घाला कोथळेयांसि दंडवतः''
3) ''नेणचि बाः चुकलीये पापीणिः''

**प्र5. खालील प्रश्नाचे उत्तर सात-आठ ओळीत लिहा.**

1) या पाठाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**प्र5. जोड्या जुळवा.**

| अ | ब |
|---|---|
| 1) करवती | अ) रागावली |
| 2) कोपली | ब) सारंगपंडित पत्नी |
| 3) कोथळोबा | क) लीळाचरित्र कर्ता |
| 4) म्हाइंभट | ड) सामान्य शिष्य |
| 5) उमाइसा | इ) वस्त्राचे उदकपात्र |

**भाषाभ्यास :-**

**1. चक्रधर स्वामींच्या दिनचर्येची माहिती मिळवा.**

**2. समानार्थी शब्द लिहा.**

1. शुद्र 2. माता 3. बंधु 4. पात्र 5. दंडवत 6. अनुताप

**उपक्रम :-**

1. म्हाइंभटांचे 'लीळाचरित्र' मिळवून वाचा आणि समजून घ्या.
2. डॉ. विष्णू भिकाजी कोलते संपादित 'महानुभाव गद्य' हे पुस्तक वाचा.

❉❉❖❉❖❉❖❉❉

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# वाक्याचे प्रकार

एक पूर्ण विचार व्यक्त करणाऱ्या शब्दांच्या समूहाला 'वाक्य' असे म्हणतात. प्रत्येक वाक्यात आपण कोणाबद्दल काहीतरी बोलतो म्हणजे विधान करतो. ज्याच्या विषयी वक्ता बोलतो त्याला 'उद्देश' असे म्हणतात व उद्देशाविषयी तो जे काही बोलतो त्यास 'विधेय' असे म्हणतात.

उदा. प्रसाद आज चांगला खेळला.

या मध्ये 'प्रसाद आज' हे उद्देश आणि 'चांगला खेळला' हे विधेय आहे.

वाक्य पृथक्करणाच्या दृष्टीने वाक्याचे पुढील प्रमाणे तीन प्रकार पडतात.

I) केवल किंवा शुद्ध वाक्य
II) मिश्र वाक्य
III) संयुक्त वाक्य

**I. केवल किंवा शुद्ध वाक्य** - ज्या वाक्यात एकच उद्देश व एकच विधेय असते त्यास 'केवल किंवा शुद्ध' वाक्य म्हणतात.

उदा. 1) आरतीने निबंध लिहिला.
2) तानाजी लढता लढता मेला.
3) कृष्णा नदी पवित्र आहे.

**II. मिश्र वाक्य** - एक प्रधान वाक्य व एक किंवा अधिक गौण वाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययानी जोडून जे एक वाक्य तयार होते त्यास 'मिश्रवाक्य' असे म्हणतात.

* वाक्यात 'म्हणजे' 'की' 'म्हणून' 'कारण' 'का की' 'यास्तव' 'जर तर' 'जे ते ' 'जेव्हा तेव्हा' 'तर' ही गौणत्व दर्शक उभयान्वयी अव्यये येतात.

उदा. 1) जे चकाकते ते सोने नसते.
2) आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो.
3) शिक्षक म्हणाले, की प्रत्येकाने नियमितपणे अभ्यास केला पाहिजे.

* पहिल्या वाक्यात 'जे चकाकते' हे केवल वाक्य आहे. 'ते सोने नसते' हे दुसरे केवल वाक्य आहे. यातील 'जे चकाकते' हे अर्थाच्यादृष्टीने स्वतंत्र वाक्य नाही. 'ते सोने नसते' या स्वतंत्र वाक्यावर अवलंबून आहे. जे वाक्य स्वतंत्र असते त्यास 'प्रधान' किंवा 'मुख्य' वाक्य म्हणतात व अवलंबून राहणाऱ्या वाक्याला गौण वाक्य म्हणतात.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

*   दुसऱ्या वाक्यात'आकाशात जेव्हा ढग जमतात' हे गौण वाक्य आहे ते'तेव्हा मोर नाचू लागतात' या प्रधान वाक्यास 'जेव्हा' या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययानी जोडले आहे.

*   तिसऱ्या वाक्यात 'शिक्षक म्हणाले' हे मुख्य वाक्य असून 'प्रत्येकाने नियमित अभ्यास केला पाहिजे' हे गौण वाक्य 'की' या गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययाने जोडले आहे.

**III. संयुक्त वाक्य** - दोन किंवा अधिक केवल वाक्ये प्रधान-बोधक उभयान्वयी अव्ययानी जोडली असता, जे एक जोडवाक्य तयार होते त्यास 'संयुक्त वाक्य' असे म्हणतात.

*   अशा, वाक्यातून सामान्यतः 'आणि' 'व' 'अन्' 'शिवाय' 'वा' 'अथवा' 'किंवा' 'पण' परंतु 'परी' या सारखी प्रधानत्व सूचक उभयान्वयी अव्यये वापरली जातात.

    उदा. 1) राधेने खूप वाट पाहिली परंतु श्रीकृष्ण आलेच नाहीत.

    2) सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो किंवा मित्राबरोबर फिरावयास जातो.

    3) तू ये व त्याला बरोबर घेऊन ये, आपण जाऊ.

    वरील वाक्यात 'राधेने खूप वाट पाहिली' 'सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो' 'तू ये' ही वाक्ये 'परंतु' 'किंवा' 'व' या उभयान्वयी अव्ययानी जोडलेली आहेत.

*   संयुक्त वाक्याच्या संदर्भात पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

    1) त्यात दोन किंवा अधिक केवल वाक्य असतात.

    2) त्यात एक केवळ आणि एक मिश्र वाक्यही असू शकेल.

    3) त्यात दोन मिश्र वाक्येही येऊ शकतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# वृत्त विचार

आपल्या मनात येणारे विचार आपण भाषेद्वारे व्यक्त करतो. ही विचार व्यक्त करण्याची पद्धती दोन प्रकारची आहे.

आपले विचार आपण जसेच्या तसे व्यक्त करतो. बोलून दाखवितो. त्या स्वाभाविक बोलण्याला गद्य असे म्हणतात.

उदा. माझ्या मनात नाव विणीते ग. हे वाक्य गद्य आहे. हेच विचार ठराविक क्रमाने लिहून सुरावर म्हणता येतील. अशा पद्धतीने रचना केली तर त्याला पद्य म्हणतात. वरील ओळ पद्यात अशी होईल उदा. - माझ्या मनात विणीते नाव ग! अशी होईल.

गद्य वाचता येते तर पद्य सुरावर म्हणतात. तेव्हा सारख्या अंतराने टाळी वाजवावी वाटते, यालाच लय म्हणतात. अशी पद्याची विशिष्ट लयबद्ध शब्दरचना करतात त्याला 'वृत्त' किंवा 'छंद' म्हणतात.

अशा वृत्त रचनेत कविता लिहिण्याची पद्धत असते. त्यात प्रत्येक ओळीत ठराविक अक्षरे असतात आणि त्यातील प्रत्येक शब्दाचा ऱ्हस्व दीर्घ क्रमही ठराविक असतो खरे तर अशी रचना करणे व अर्थवाही कविता लिहिणे कठीण काम आहे. पण आपले पंडित कवी हे व्याकरण जाणणारे होते. त्यामुळे पूर्वीची केकावली, हरिवंश ही काव्ये श्रेष्ठ ठरली. वृत्ताचे दोन प्रकार आहेत.

1) अक्षरगण वृत्त
2) मात्रावृत्त

1) ऱ्हस्व अक्षराना लघु असे म्हणतात.
2) दीर्घ अक्षराना गुरू असे म्हणतात.
3) लघु अक्षराची खूण ∪ अशी अर्धचंद्राकृती असते तर गुरू अक्षरांची खूण - अशी आडवी रेषा असते.

पद्याच्या ओळीत तीन अक्षरांचे गट करतात व त्यांना लघु गुरू क्रम देतात याला गण पाडणे म्हणतात. ते असे

**∪ लघु नुसार**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | आद्य लघु | य मा ता<br>∪ - - | य गण |
| 2) | मध्य लघु | रा ज भा<br>- ∪ - | र गण |
| 3) | अंत्य लघु | ता रा प<br>- - ∪ | त गण |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

4) सर्व लघु न म न न गण

∪∪∪

**- गुरू नुसार**

1) आद्य गुरू भा स्क र भ गण

- ∪ ∪

2) मध्य गुरू ज ना स ज गण

∪ - ∪

3) अंत्य गुरू स म रा स गण

∪ ∪ -

4) सर्व गुरू मा ना वा म गण

- - -

वरील उदाहरणावरून लक्षात येते की ऱ्हस्व अक्षरांना लघु म्हणतात व दीर्घ अक्षरांना गुरू म्हणतात. तसेच अनुस्वार असेल तर ते अक्षर गुरू म्हणतात. तसेच विसर्गाच्या अगोदरचे अक्षर, रफारच्या अगोदरचे अक्षर, जोर पडणारे अक्षर, कवितेतील शेवटचे अक्षर गुरू मानण्याची पद्धत आहे.

**यती** - कवितेचे चरण म्हणताना आपण मध्येच काही अक्षरावर थांबतो, त्या थांबण्याच्या जागेला 'यती' असे म्हणतात. यतीच्या जागी शब्द पुरा व्हावा.

कवितेतील ओळीचे/ चरणाचे तीन-तीन अक्षराचे गट पाडल्यानंतर त्या चरणाच्या शेवटी दोन अक्षरे उरली ती एक लघु एक गुरु असेल तर 'ल ग' व दोन्ही अक्षरे गुरू असतील तर 'ग ग' असे लिहावे.

अक्षराच्या संख्येवरून ते वृत्त ठरविले जाते.

1) भुजंगप्रयात - या अक्षरगण वृत्तात 12 अक्षरे असून यती 6व्या अक्षरावर असतो व गण 'य, य, य, य' असे पडतात.

मना श्रेष्ठ धारीष्ट जीवी धरावे ।
मना बोलणे नित्य सोशीत जावे ।

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

स्वये सर्वथा नम्र वाचे वदावे ।
मना सर्व लोकासि रे नीववावे ।।

| म ना श्रे | ष्ठ धा री | ष्ट जी वी | ध रा वे |
|---|---|---|---|
| ∪ - - | ∪ - - | ∪ - - | ∪ - - |
| य | य | य | य |

होई वसंततिलका तभजाजगागी, भुजंग प्रयाती 'य' हे चारी येती.

2) **वसंततिलका -** या अक्षरगण वृत्तात 14 अक्षरे असून यती 8व्या अक्षरावर असतो व गण 'त, भ, ज, ज, ग, ग' असे पडतात.

आरक्त होय फुलूनी प्रणयी पलाश
फेकी रसाळ तरुही मधुगंधपाश
ऐकू न ये तुज पिकस्वरे मंजुळे का?
वृत्ती वसंततिलका न तुझी खुले का?

| वृ त्ती व | सं त ति | ल का न | तु झी खु | ले | का |
|---|---|---|---|---|---|
| - - ∪ | - ∪ ∪ | ∪ - ∪ | ∪ - ∪ | - | - |
| त | भ | ज | ज | ग | ग |

❋❋❖❋❖❋❖❋❋

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# शुद्ध लेखनाचे नियम

## I अनुस्वार

नियम 1 : ✻ स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्ष बिंदू द्यावा.
उदा. : गुलकंद, निबंध, आंबा, तंटा.

✻ तत्सम (संस्कृतातून मराठीत जसेच्या तसे आलेले शब्द) शब्दातील अनुनासिकाबद्दल विकल्पनाने पर-सवर्ण लिहिण्यास हरकत नाही.
उदा. : अंतर्गत्-अन्तर्गत, पंडित-पण्डित.

✻ अर्थभेद करण्यासाठी पर सवर्णच लिहावेत.
उदा. : वेदांत-वेदान्त, देहांत-देहान्त.

नियम 2 : ✻ य् र् ल् व् ष् स् ह् यांच्या पूर्वी येणाऱ्या अनुस्वाराबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.
उदा. : सिंह, संयम, मांस.

नियम 3 : ✻ नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरुपावर विभक्ती प्रत्यय व शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार द्यावा.
उदा. : लोकांना, तुम्हांस, घरांपुढे, लोकांसमोर.

✻ आदरार्थी बहुवचनाच्या वेळी ही असा अनुस्वार दिला पाहिजे.
उदा. : मुख्यमंत्र्यांचा दौरा, तुम्हांला, आपणांस.

नियम 4 : ✻ वरील नियमा व्यतिरिक्त कोणत्याही कारणासाठी व्युत्पतीने सिद्ध होणारे किंवा न होणारे अनुस्वार देऊ नयेत.
उदा. : पाच, नाव, तेव्हा घरे, करणे, बोलणे या सारख्या शब्दात अनुस्वार देण्याची आता गरज नाही.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

## II ऱ्हस्व-दीर्घ

नियम 5 : ✻ मराठीतील तत्सम इकारान्त व उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावे.
उदा. : कवी, मती, गुरु, गती.

✻ शब्दांच्या अंती येणारा इकार, उकार, दीर्घ लिहावा.
उदा. : पाटी, जावू, विनंती.
अपवाद - आणि, नि.

✻ तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी.
उदा. : परंतु, यथामति, तथापि.

✻ सामासिक शब्दांतही ऱ्हस्व इकारान्त व उकारान्त शब्द पूर्व पद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे.

उदा. : कविमन, बुद्धिवैभव, गतिशील.

✻ व्यक्तिनामे, ग्रंथनामे, शीर्षके व सुटे ऱ्हस्वान्त तत्सम शब्द मराठीत दीर्घान्त लिहावे.

उदा. : हरी, मनुस्मृती, कृषी, कुलगुरू.

✻ सामासिक शब्दांमध्ये तत्सम शब्द ऱ्हस्वान्त लिहावे.

उदा. : अनुशक्ती, विधिनिषेध, कृतिसमिती.

✻ साधित शब्दांनाही हाच नियम लावावा.

उदा. : गतिमान, मृदुतर, शक्तिमान.

✻ विद्यार्थी, प्राणी, स्वामी या सारखे शब्द समासात पूर्वपदी आले असता ऱ्हस्वान्तच लिहावेत.

उदा. : गुणिजन, विद्यार्थिमंडळ, स्वामिनिष्ठा.

नियम 6 : ✻ इकारात व उकारान्त शब्दातील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावे.

उदा. : गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू.

अपवाद : नीती, रीती, कीर्ती, प्रीती, दीप्ती.

✻ तत्सम शब्दाना हा नियम लागू नाही.

उदा. परीक्षा, पूजा, ऊर्जा.

✻ हा नियम एकारान्त व ओकारान्त शब्दांनाही लागू आहे.

उदा. पाहिले, मिळवितो.

नियम 7 : ✻ अकारान्त शब्दांचे उपान्त्य इकार, उकार दीर्घ लिहावे.

उदा. : गरीब, वकील, सून, वसूल, फूल, फकीर, पूर, ठरीव.

अपवाद : ऱ्हस्वोपान्त्य अकारांत तत्सम शब्द.

उदा. गुण, विष, मधुर, प्रचुर.

अपवाद म्हणून तत्सम शब्द मात्र ऱ्हस्वान्त लिहावयाचे आहेत.

उदा. : शारीरिक, मानसिक, साहित्य उचित.

✻ मराठी शब्दातील अनुस्वार, विसर्ग, जोडाक्षर यांच्या पूर्वीचे इकार, उकार सामान्यतः ऱ्हस्व असतात.

उदा. : भिंग, सुंठ, खुंटी, छिः, थुः, विस्तव, निःपक्षपाती.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

नियम 8 : ✻ उपान्त्य दीर्घ ई-ऊ असलेल्या शब्दांचा उपान्त्य ई कार - ऊकार उभयवचनी सामान्य रूपाच्यावेळी ऱ्हस्व लिहावा.

उदा. : गरिबांस, वकिलांना, सुनेला, नागपुरास.

अपवाद : दीर्घोपान्त्य तत्सम शब्द.

उदा. : शरीरास, जीवास, गीतेत.

# III ऱ्हस्व-दीर्घ

✻ शब्दांचे उपान्त्य अक्षर 'ई' किंवा 'ऊ' असेल तर सामान्य रूपात 'ई' च्या जागी 'य' व 'ऊ' च्या जागी 'व' येतो.

उदा.: फाईल-फायलीत, देऊळ-देवळात, पाऊस-पावसात.

✻ पुल्लींगी शब्दांच्या शेवटी 'सा' असल्यास सामान्य रूपाच्यावेळी 'शा' होतो.

उदा. : पैसा-पैशाच्या, ससा-सशाला, घसा-घशाला.

✻ पुल्लींगी शब्दांच्या शेवटी 'जा' सामान्य रूपात तसाच राहतो.

उदा. : मांजा-मांजाने, सांजा-सांजाची.

✻ मधल्या अक्षरातील 'क' किंवा 'प' चे द्वित्व सामान्य रुपाच्या वेळी निघून जाते.

उदा. : रक्कम-रकमेचा, तिप्पट-तिपटीने.

✻ 'ऊ' कारांत विशेष नामाचे सामान्यरूप होत नाही.

उदा. : गणू-गणूस, शकू-शकूस.

✻ धातूला 'ऊ' किंवा 'ऊन' प्रत्यय लावताना धातूच्या शेवटी 'व' असेल तर 'वू' किंवा 'वून' होईल.

उदा. : चाव-चावू-चावून, जेव-जेवू-जेवून.

# IV किरकोळ

नियम 9 : ✻ 'पूर' हा ग्रामवाचक शब्द कोणत्याही ग्राम नामास लावताना दीर्घोपान्त्य लिहावा.

कोल्हापूर, नागपूर, सोलापूर, तारापूर, तुळजापूर.

नियम 10 : ✻ कोणता, एखादा ही रूपे लिहावी कोणाचा, एकादा ही रूपे लिहू नयेत.

नियम 11 : ✻ हळूहळू, मुळूमुळू, या शब्दातील दुसरा व चौथा स्वर दीर्घ लिहावा. पुनरुक्त शब्द नादानुकारी असतील तर ते उच्चाराप्रमाणे ऱ्हस्व लिहावे.

✻✻❖✻❖✻❖✻✻

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# वाक्प्रचार व अर्थ

| | वाक्प्रचार | | अर्थ |
|---|---|---|---|
| 1) | आकाश पातळ एक करणे | = | खूप आरडा ओरड करणे. |
| 2) | आनंद गगनात न मावणे | = | अतिशय आनंद होणे. |
| 3) | उखळ पांढरे होणे | = | खूप पैसा मिळणे. |
| 4) | उपसर्ग होणे | = | त्रास होणे. |
| 5) | अठरा विश्वे दारिद्रय असणे | = | अतिशय गरीबी असणे. |
| 6) | आहुती देणे | = | प्राण अर्पण करणे. |
| 7) | इतिश्री होणे | = | शेवट होणे. |
| 8) | अंगाचा तिळपापड होणे | = | भयंकर राग येणे. |
| 9) | कणीक तिंबणे | = | खूप मार देणे. |
| 10) | कच खाणे | = | माघार घेणे. |
| 11) | करुणा भाकणे | = | दयेची याचना करणे. |
| 12) | डोळ्यावर कातडे ओढणे | = | दुर्लक्ष करणे. |
| 13) | छाती फुटणे | = | धक्का बसणे. |
| 14) | गळ्यातला ताईत बनणे | = | अतिशय आवडता असणे. |
| 15) | पाठीत खंजीर खुपसणे | = | विश्वासघात करणे. |
| 16) | 'ग' ची बाधा होणे | = | गर्व चढणे. |
| 17) | पोटावर पाय देणे | = | उपजीविकेचे साधन नष्ट करणे. |
| 18) | खाईत टाकणे | = | संकटात टाकणे, त्रासात टाकणे. |
| 19) | जिवाचे रान करणे | = | खूप कष्ट करणे, मेहनत करणे. |
| 20) | तोंडावर येणे | = | अगदी जवळ येणे, समीप येणे. |
| 21) | पालन पोषण करणे | = | संगोपन करणे. |
| 22) | फत्ते होणे | = | विजय मिळविणे, कामगिरीत यश मिळणे. |
| 23) | खुणगाठ बांधणे | = | निश्चय करणे. |
| 24) | पालथ्या घागरीवर पाणी | = | निष्फळ श्रम. |
| 25) | न भूतो न भविष्यती होणे | = | पूर्वी न झालेली व पुढे न होणारी गोष्ट घडणे. |

**वाक्प्रचार :** शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा वेगळ्या विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्द समूहाला 'वाक्प्रचार' असे म्हणतात. यालाच कोणी 'वाक्यसंप्रदाय' ही म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# म्हणी आणि त्यांचा अर्थ

| म्हणी | | अर्थ |
|---|---|---|
| 1) असतील शिते तर जमतील भुते | = | जोपर्यंत आपल्या जवळ पैसा आहे तोपर्यंत आपल्याभोवती माणसे जमतात. |
| 2) आयत्या बिळात नागोबा | = | स्वतः कष्ट न करता फायद्याची गोष्ट पदरात पाडून घेणे |
| 3) असंगाशी संग प्राणाशी गाठ | = | दुष्टाशी संगत फार मोठा घात करू शकते. |
| 4) उथळ पाण्याला खळखळाट फार | = | थोडेसे ज्ञान असलेला मनुष्य त्याचा गाजावाजा फार करतो. |
| 5) उचलली जीभ लावली टाळ्याला | = | शक्याशक्यतेचा विचार न करता बोलणे. |
| 6) ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये | = | उपकारकर्त्याला फार त्रास देऊ नये. त्यामुळे आपलेच नुकसान होते. |
| 7) एक घाव दोन तुकडे | = | त्वरित निर्णय घेणे. |
| 8) करावे तसे भरावे | = | आपण जसे कृत्य करतो तसे त्याचे फळ मिळते. |
| 9) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ | = | आपलाच नातेवाईक आपले नुकसान करतो. |
| 10) घर ना दार देवळी ना बिऱ्हाड | = | सदाफटींग असणे, भणंग असणे |
| 11) घरोघरी मातीच्या चुली | = | सगळीकडे सर्व साधारण एकच परिस्थिती असते. |
| 12) केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी | = | अत्यंत गरीब परिस्थिती असणे. |
| 13) टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही. | = | कष्ट घेतल्याशिवाय मोठेपणा मिळत नाही. |
| 14) दुष्काळात तेरावा महिना | = | संकटात आणखी संकटाची भर |

@KTRS NOT TO BE REPUBLISHED

| | | | |
|---|---|---|---|
| 15) | चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे | = | प्रत्येकाच्या आयुष्यात केव्हातरी चांगले दिवस येतात. |
| 16) | डोंगर पोखरून उंदीर काढणे | = | कष्टाच्या मानाने अगदी अल्प मोबदला मिळणे. |
| 17) | डोळयात केर कानात फुंकर | = | रोग एक उपचार दुसरा. |
| 18) | सारे मुसळ केरात | = | केलेल्या सर्व गोष्टी वाया जाणे. |
| 19) | हा सूर्य हा जयद्रथ | = | प्रत्यक्ष पुरावा दाखवून एखादी गोष्ट सिद्ध करणे. |
| 20) | हातचे सोडून पळत्याच्या पाठीस लागू नये | = | सहज मिळणारी गोष्ट पदरात पाडून घ्यावी, न मिळणाऱ्या गोष्टींच्या मागे लागू नये. |
| 21) | पी हळद हो गोरी | = | फार उतावीळ होणे |
| 22) | प्रयत्नांती परमेश्वर | = | दीर्घ प्रयत्नाने चांगल्या गोष्टी साध्य होतात. |
| 23) | पाचा मुखी परमेश्वर | = | पुष्कळ लोक जे बोलतात ते खरे |
| 24) | हजीर तो वजीर | = | जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो. |

म्हण :- सर्वांच्या बोलण्यात सतत येणारे चिमुकले, चटकदार, बोधप्रद व सर्वसामान्य वचन म्हणजे म्हण होय. म्हणींना 'तोंडचे वाङ्मय किंवा अनुभवाच्या खाणी' असेही म्हणतात. अनेकांना येणारा अनुभव एकजण आपल्या शहाणपणाने छोट्या सिद्धांत स्वरूपी सुत्रमय वाक्यात मांडून दाखवितो.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# निबंध लेखन

निबंध याचा अर्थ (नि+बंध) बांधणे, गुंफणे, जुळविणे असा आहे.यात आपण आपल्याला सुचणाऱ्या विचारांची गुंफण करतो. आपल्या मनात निर्माण झालेल्या विचारापैकी योग्य विचार एकत्र करून एखाद्या फुलाऱ्याच्या कुशलतेने सुंदर विचारांची फुले एकत्र करून हार तयार करतो. म्हणजे निबंधात आकर्षक, योग्य विचारांची फुले निवडून त्यांची गुंफण महत्त्वाची असते. ज्याचे अनुभवविश्व संपन्न, ज्याचे वाचन चांगले, ज्याने वृत्तपत्रे वाचली आहेत अर्थात त्याचा निबंध चांगला होणार हे निश्चित.

साधारण 8वी, 9वी व 10वी च्या प्रश्नपत्रिकेत निबंध हा विषय 5 गुणांचा असतो यात निबंध लिहिताना खालील गोष्टी ध्यानात ठेवाव्यात.

1) निबंधाची भाषा सोपी असावी, मुद्देसूद लिहावे.
2) स्वतःचे विचार असावेत.
3) आवश्यक तेथे सुभाषिते, वचने द्यावीत.
4) योग्य परिणाम कारक परिच्छेद लिहून शेवट करावा.

**आता निबंधाचे प्रकार पाहू.**

1) वर्णनात्मक निबंध
2) वैचारिक निबंध
3) आत्मवृत्तात्मक निबंध
4) कल्पनाप्रधान निबंध
5) चर्चात्मक निबंध
6) व्यक्तिचित्रणात्मक निबंध
7) संस्मरणात्मक निबंध
8) चिंतनात्मक निबंध
9) वैज्ञानिक निबंध
10) शब्द चित्र
11) ललित निबंध

यावर्षी आपल्याला कर्नाटक सरकारच्या शिक्षण खात्याच्या धोरणानुसार खालील विषय निबंधासाठी आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

1) प्रदूषण - एक समस्या
2) अंधश्रद्धा - एक शाप

**निबंध लेखनासाठी महत्त्वाचे मुद्दे -**

**1) प्रदूषण - एक समस्या**

पर्यावरण म्हणजे काय? ..... प्रदूषणाची कारणे ध्वनी, वायू, पाणी प्रदूषित बनले आहे ...... वृक्षतोड ..... लोकसंख्या वाढ ...... प्लॅस्टिकचा वापर. रासायनिक खतांचा जास्त वापर .... उपाय .... झाडे वाढवा. नद्या, कूपनलिका भोवतीचा परिसर स्वच्छ असावा .... लोकसंख्या नियंत्रित ठेवण्याचे उपाय ... सुजलाम सुफलाम वसुंधरेचे स्वप्न साकार करणे आपल्या हाती. 5 जून हा दिवस वसुंधरा दिवस म्हणून खऱ्या अर्थाने साजरा व्हावा.

**2) अंधश्रद्धा - एक शाप**

अंधश्रद्धेचा अर्थ ..... उदाहरणे - समाजाला लागलेली कीड .... देवदासी समस्या ..... अघोरी उपाय चेटूक, भानामती, बुवा बाजी ..... यामुळे फसवणूक ..... समाज पुन्हा 18व्या शतकाकडे.... उपाय... वैज्ञानिक जाणीव निर्माण करणे.... कायदे करणे ... देवदासी-अंधश्रद्धा निर्मूलन सारख्या संस्थांच्या शाखा स्थापन करणे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन बाळगणे.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# अंधश्रद्धा

एकदा एका मंदिराच्या पालखीचा सोहळा सुरू होता. मंदिरात सुवासिनी एका हातात आरतीचे ताट व दुसऱ्या हातात नैवेद्याचे ताट घेऊन पालखीची वाट पाहत उभ्या होत्या. पालखी बरीच लांब होती. तेवढ्यात त्यातील एका स्त्रीच्या पाठीत खाज सुटली, म्हणून तिने आपल्या हातातील ताट खाली न ठेवताच मंदिरातील एका खांब्याला आपली पाठ घासली. दुसऱ्या स्त्रीने ते पाहिले देवाचा असा एखादा रिवाज, पद्धत असावी असे वाटून तिनेही आपली पाठ त्याच खांबाला तशाच पद्धतीने घासली. ते पाहून बाकीच्या स्त्रियांनीही तोच कित्ता गिरविला.

कोणत्याही गोष्टीची खातरजमा न करता एखाद्या गोष्टीचे अनुकरण करणे याला अंधश्रद्धा असे म्हणतात. आजच्या विज्ञान युगात 'जग चंद्रावर तर पांडू डोंगरावर' अशी आम्हा भारतीयाची स्थिती आहे. अंगात देव येणे, भानामती, भूतबाधा होणे, केसात जट आली म्हणून मुलीला देवाला सोडणे (देवदासीप्रथा), देवापुढे कोंबडे, बकरी बळी (पशूबळी) देणे अशा अनेक अंधश्रद्धा समाजात सुशिक्षित लोकही मानत आहेत. व त्या परंपरेने लोक जपतही आहेत. बुवाबाजी वाढली आहे.

कोणत्याही कार्याला प्रारंभ करताना शुभ मुहूर्त, शुभदिवस पाहतो. खरे पाहता चांगले काम करण्यासाठी प्रत्येक क्षण हा शुभमुहूर्तच आहे. म्हणून 'शुभस्य शीघ्रं' असे म्हटले. शकून आणि अपशकून यांचे ओझे सतत बाळगल्यामुळे आपण आपल्या जीवनातील अमूल्य अशा संधी वाया घालवत असतो. अशा घातक अंधःश्रद्धांवर आपल्या मनगटातील ताकदीच्या बळावर मात केली पाहिजे.

आपणच आपल्याला अनिष्ट रूढीच्या बंधनातून मुक्त केले पाहिजे. ज्या रूढीना कुठेही आधार नाही, चार लोक करतात म्हणून आपण न करता सत्यासत्य पडताळले पाहिजे. पशूबळी न देता त्यानाही आपण 'जगा व जगू द्या' या नियमाप्रमाणे जगू दिले पाहिजे. लोकांना देवदासी प्रथेपासून दूर ठेवले पाहिजे. भानामती, अंगात देव येणे, भूतबाधा होणे यावर विश्वास ठेवू नये. होळीच्या दिवसात लाकूड जाळण्याऐवजी या जुन्या वाईट रूढीना नष्ट करून त्या जाळून टाकून केशवसुतांची 'जुने जाऊ द्या मरणालागूनी जाळून किंवा पुरून टाका' ही उक्ती सार्थ केली पाहिजे.

❋❖❋❖❋❖❋❖❋

NOT TO BE REPUBLISHED
©KTBS

# पत्र लेखन

पत्रलेखन म्हणजे लेखी निरोप होय. सध्या टेलीफोन, भ्रमण ध्वनी यांच्या प्रसारामुळे पत्र लेखनाचे महत्त्व कमी होत आहे. पत्र लेखन ही एक कला असून त्याचे तंत्रही तितकेच महत्त्वाचे आहे.

पत्रात पाच महत्त्वाची अंगे सांभाळावी लागतात. ती ठराविक तंत्रानुसार लिहावी लागतात.

1) पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व त्या दिवसाची तारीख
2) मायना किंवा संबोधन
3) मजकूर/पत्रातील विषय मांडणी
4) समारोप/शेवट
5) ज्याला पत्र लिहिले आहे त्याचा पत्ता

पत्र लेखनात दोन महत्त्वाचे प्रकार आहेत.

1) कौटुंबिक पत्रे   2) सामाजिक / व्यावसायिक पत्रे

कौटुंबिक पत्राचे विषय व सामाजिक पत्राचे विषय वेगळे असतात. विषयानुरुप पत्राचा मजकूर कमी जास्त होऊ शकतो. पत्र आटोपशीर पण विषयाचा पूर्ण खुलासा करणारे असावे. विराम चिन्हे योग्य रीतीने द्यावीत. पत्र पाठविणाऱ्याच्या नावावर 'प्रेषक' तर स्वीकारणाऱ्याच्या पत्त्यावर 'प्रति' असे लिहून नाव लिहावे.

पत्र लिहून झाल्यावर पत्र लिहिणाऱ्याच्या लक्षात येते की एखादी महत्त्वाची गोष्टच लिहायची राहिली आहे ती पत्र मिळणाऱ्याशी अगदी जवळची, निगडीत आहे. ती लिहायलाच हवी. मग आपल्या अखेरच्या उजव्या कोपऱ्यातील नावाच्या खाली डाव्या बाजूला ता.क. म्हणजे 'ताजा कलम' असे लिहून आठवलेला मजकूर लिहितात.

नातेवाईकांच्या पत्रातील भाषा घरगुती, मनमोकळी व खेळकर असावी. ज्याला पत्र लिहितो त्याच्याशी खुल्या दिलाने बातचीत करतो आहे असे वाटावे. पत्र वाचताना जणू ती व्यक्ती आपल्याशी बोलते आहे असे वाटावे/असा भास झाला पाहिजे.

मित्राला पत्र लिहिताना भाषा थोडी सलगीची असावी. त्रयस्थ व्यक्तिस लिहावयाचे असेल तर भाषा थोडी रोख-ठोक चालू शकते.

*********

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# काही पत्रांचे पूर्वापार चालत आलेले मायने व शेवट

| अ.नं. | व्यक्ती/कोणास | मायना | शेवट |
|---|---|---|---|
| 1. | आई | ती.सौ. आईस, सा.न.वि.वि.<br>(वडील नसल्यास सौ. लिहू नये) | तुझा/तुझी आज्ञाधारक,<br>पुत्र/मुलगी/कन्या, |
| 2. | वडील | ती. बाबांना,/ती वडिलांचे सेवेशी, कृ. सा.न.वि.वि. | आपला/आपली आज्ञाधारक,<br>पुत्र/मुलगी/कन्या, |
| 3. | चुलते | ती. स्व. काका/तात्या यांना, | तुमचा पुतण्या/पुतणी, |
| 4. | मोठा भाऊ | ती. स्व. दादा/आण्णा यास,<br>सा.न.वि.वि. | तुझा भाऊ/बहीण, |
| 5. | लहान भाऊ | चि. यास,<br>अनेक शुभाशीर्वाद | तुझा दादा/आण्णा/ताई, |
| 6. | मित्र/मैत्रीण | प्रिय मित्र/मैत्रीण,<br>यास/हीस सप्रेम नमस्कार | तुझा मित्र/तुझी मैत्रीण, |
| 7. | गुरुजी/शिक्षक | मा. गुरुवर्य यांना,<br>सा.न.वि.वि. | आपला/आपली नम्र, |
| 8. | मोठी बहीण | ती. स्व. सौ. ताईस,<br>सा.न.वि.वि.<br>(अविवाहित असल्यास सौ. च्या जागी कु. लिहावे) | तुझा भाऊ/तुझी बहीण, |
| 9. | लहान बहीण | चि. हीस,<br>अनेक शुभाशीर्वाद | तुझा भाऊ/दादा/आण्णा,<br>तुझी ताई/आक्का, |
| 10. | व्यवसाया निमित्त संबंध येणारी माननीय थोर व्यक्ती | माननीय श्री यांना,<br>सा.न.वि.वि. | आपला विश्वासू,<br>आपली विश्वासू |

काही अक्षरे व त्यांचा खुलासा

1) ती. - तीर्थरूप 2) ती. स्व. = तीर्थ स्वरूप 3) सौ. सौभाग्यवती 4) सा.न.वि.वि. साष्टांग नमस्कार विनंती 5) स. सप्रेम 6) श्री. = श्रीयुत, श्रीमती 7) ता.क. = ताजा कलम

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

नियमित अभ्यासाचे महत्त्व पटवून देण्यासाठी धाकट्या भावाला पत्र लिहा -

।। श्री ।।

प्रेषक -
प्रसाद एस. पाटील,
श्री समर्थ विद्यालय,
विद्यार्थी वसतिगृह, तळेगाव.
पिन कोड 411002.
तारीख -

चि. वैजनाथ यास,

अनेक आशीर्वाद

कालच दादाचे पत्र मिळाले. त्यात तुझ्या परीक्षेचा निकाल वाचून अतिशय वाईट वाटले.

वैजू, तुला सर्व विषयात कमी गुण मिळाले आहेत बघ, आणि इंग्रजी व गणित या विषयात तर तू नापासच झाला आहेस.

यावरून असे वाटते की, तू नियमित अभ्यास करत नाहीस. अरे, शिक्षणाशिवाय या जगात काहीच तरणोपाय नाही. तू चांगला अभ्यास करून गुण मिळविलेस तरच तुला पुढे फायदा होईल. आताच कष्ट घेतले तर पुढे सुख मिळेल. म्हणतात ना टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

असाच जर तू आळशी बनून दुर्लक्ष करशील तर तू वार्षिक परीक्षेत नापास होशील व सर्वजण हेटाळणी करतील. त्यामुळे घरच्या लोकांना किती वाईट वाटेल? विचार कर. अजून परीक्षेला वेळ आहे तोपर्यंत नियमित अभ्यास करून उत्तम गुण मिळवून वरच्या वर्गात जा. गेलेली वेळ पुन्हा येत नाही याची जाणीव ठेव.

अथर्वचा खट्याळपणा कमी झाला की नाही? कावेरी नियमित शाळेला येते ना? घरी ती सौ. आई, काकू, ती. बाबा, काका याना शि.सा. नमस्कार.

तुझा दादा,
प्रसाद.

प्रति,
पत्ता -
वैजनाथ एस. पाटील,
'कृष्ण कुंज',
निपाणी, जि. बेळगावी.
पिन-591215

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# आकलन (सारग्रहण)

विद्यार्थ्यांचे भाषेबद्दलचे ज्ञान अजमावून पाहण्यासाठी क्रमिक गद्य पद्य संग्रहाच्या बाहेरील एखादा उतारा देऊन तो कितपत समजला आहे हे पाहण्यासाठी त्या उताऱ्यावर काही प्रश्न विचारले जातात. या प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी आपल्या भाषेत द्यावीत अशी अपेक्षा असते.

त्याकरितां उतारा प्रथम एकदा दोनदा वाचावा व त्यातील उत्तरे आपल्या भाषेत मांडावीत काही नमुन्यादाखल उतारे -

①

जातीने मनुष्य श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरतो, हा विचार सर्व संत-महंतानी आणि विचारवंतानी पुसून टाकण्याचा अखंड प्रयत्न केला आहे. संताचे विचार आणि आचार समतेचे द्योतक आहेत. ज्यांच्या मनात समता नाही आणि ममताही नाही, त्याला संतत्वाच्या आणि देवत्वाच्या जवळ जाण्याचा अधिकार कधीच लाभणार नाही. तोच खरा अस्पृश्य समजावा. ही विशाल आणि सर्व समावेशक दृष्टी संताच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' आणि 'जे जे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत' हा उदात्त विचार तर्कशुद्ध आहे. आपल्या खांद्यावर जातीय उच्चनीचतेचे जे पिशाच्च शतकानुशतके ठाण मांडून बसले आहे, ते फेकून दिले पाहिजे. हे अनेक संतानी गर्जून सांगितले आहे. परोपरीने सांगितले आहे. पण माणसाचा मुर्दाडपणा अलौकिक आहे. संताच्या कपाळावर त्याने जाती वर्णांची लेबले तत्परतेने आणि धूर्तपणाने चिकटविली. खरे तर साधूंचीच काय सर्व सामान्याची जात माणूसच असते. माणूसच असावी. माणसांची जात वाढावी, मानव्याची उंची वाढत जावी; हे संताचे स्वप्न आहे पण हे घडत नाही; म्हणून संताच्या वाणीला अनेक वेळा हुंदके फुटलेले आहेत.

**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

**प्रश्ने** 1) संत महंतानी कोणता प्रयत्न केला?

2) संत साहित्यातील उदात्त विचार कोणता?

3) संतवाणीला अनेक हुंदके का फुटले?

4) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## (2)

बागेतील झाडावर उमललेले एखादे टपोरे फूल असते. त्याचा सौम्यसा सुगंध आल्हाददायक असतो. त्याच्या नाजूक पाकळ्या, सुरेख रंग डोळ्यांना सुखावतात. हा छोटासा अनुभव घेतानाही आपले मन प्रसन्न होऊन जाते. इवल्याशा फांदीवर वाऱ्याच्या लहरींनी डुलणारे ते फूल त्याच दिवशी संध्याकाळी कोमेजून जाते हे खरे; पण त्यामुळे त्याचे दिवसभरातील अस्तित्व आणि जाणाऱ्या-येणाऱ्याला त्याने दिलेला आनंद या गोष्टी खोट्या ठरत नाहीत. आपणही आपले हे छोटेसे जीवन त्या फुलासारखेच सुंदर करू शकतो. या नाशवंत जीवनाला त्याच्या अस्तित्वकालापुरते का होईना; पण काही अर्थ प्राप्त करून देऊ शकतो. तसे करण्यातच या जीवनाचे काही सार्थक आहे. या जीवनाचा प्रवास करीत असताना आपल्या निकट राहून सोबत करणारी, आसपास वावरत धीर पुरवणारी, आपल्या बरोबर चार पावले पुढे चालत राहून प्रेरणा देणारी अशी निरनिराळ्या कोटीतील माणसे आपल्याला भेटतात. त्यांच्यापैकी काहींच्या सहवासामध्ये निरामय आनंदाचे क्षण लाभतात. आणखी कोणाच्या विचारामूधन अंत:करणाला काही दिलासा मिळतो आणि असामान्य विभूतीनी दाखवून दिलेल्या मार्गाच्या अल्पशा अनुसरणातून आपले जीवन उन्नत होते. या साऱ्या व्यक्तीविषयी कृतज्ञतेचा भाव ठेवणे हे जीवनातील एक कर्तव्य ठरते. त्यांचे स्मरण जागवणे हा त्यांच्या ऋणातून काही प्रमाणात उतराई होण्याचा एक मार्ग आहे.

**डॉ. वि.रा. करंदीकर**

**प्रश्ने** 1) बागेतील फूल कोणती प्रेरणा देते?

2) जीवनात कोणकोणती माणसे भेटतात?

3) थोराविषयी कृतज्ञता का दाखवायची?

4) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## 3

भारतीय संस्कृतीने ज्ञानावर व प्रेमावर भर दिला. त्याप्रमाणेच बळावर भर दिला आहे. बळ नसेल तर ज्ञान व प्रेम ही मनातल्या मनात मरून जातील. ज्ञान-प्रेमाला संसारात आणण्यासाठी, सुंदर व सुखकर करण्यासाठी बळाची नितांत आवश्यकता आहे. बलवान शरीर, निर्मळ व सतेज बुद्धी, प्रेमळ परंतु प्रसंगी वज्राप्रमाणे कठोर होणारे हृदय या सर्वांची जीवनाच्या विकासात जरूरी आहे; तरच जीवनाला समतोलपणा येईल.

उपनिषदातून बळाचा महिमा गाइलेला आहे. दुर्बलाला काही करता येत नाही. एक बलवान मनुष्य येतो व शेकडो लोकांना नमवितो. बळ नसेल तर हिंडता-फिरता येणार नाही, हिंडता-फिरता आले नाही तर ज्ञान मिळणार नाही, अनुभव मिळणार नाही, थोरांच्या गाठीभेटी होणार नाहीत, गुरुसेवा होणार नाही. बळ नसेल तर काही नाही. म्हणून बळाची उपासना करा, असे ऋषी सांगतात.

**प्रश्ने**: 1) जीवनाच्या विकासासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता असते?

2) प्राचीन काळीही बळाला महत्त्व होते हे सांगण्यासाठी गुरुजींनी कोणत्या ग्रंथाचा उल्लेख केला आहे?

3) भारतीय संस्कृती कशाकशावर भर देते?

4) बल व ज्ञान यांचा संबंध कसा येतो?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# शब्दसंग्रह

## अ

अव्वल - प्रथम दर्जाचा, उत्तम
अनमान - हयगय
असंगाशीसंग - वाईट माणसाशी संबंध
अनिच्छा - इच्छा नसताना
अनुताप - पश्चात्ताप
अकस्मात - अचानक
अपूर्व - पूर्वी कधी न पाहिलेले
अकृत्रिम - नैसर्गिक
अगा - अरे
अविंध - मुसलमान
अन्नछत्र - मोफत जेवणाची व्यवस्था

## आ

आराखडा - नकाशा, रुपरेषा
आथीपाथी - आदरसत्कार
आवाळू - शरीरावर आलेली चरबीची गाठ
आदमास - अंदाजे

## इ

इशारा - सूचना
इठ - इथे
इनाम - बक्षीस
इंद्रधनुष्य - सूर्य असताना पाऊस पडल्यावर आकाशात दिसणारी सप्तरंगी कमान.

## उ

उगाच - विनाकारण
उच्छीष्ट - उष्टे
उषा - पहाट
उभा केला - प्रकट केला.
उचलता न येणे - अधिकार नसणे.
उदार - मोठ्या मनाचा
उद्धार करणे - वर काढणे, मुक्तीदेणे

## ओ

ओवळे - अशुद्ध, अपवित्र

## अं

अंत:चक्षू - आतील डोळे
अंधशाला - अंध विद्यार्थ्यांना ज्या शाळेत शिकवले जाते ती शाळा.

## क

कवळ - घास
कयवयली - कळवळली
कर्दनकाळ - यम, मृत्यू
कस्तुरी - हरिणाच्या नाभीतील एक कातडी गाठ
करवती - वस्त्राचे केलेल उदक पात्र
कलिजा - काळीज, हृदय
कलावंतीण - गाणे गाऊन लोकांचे नोरंजन करणारी स्त्री.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| कलाकुसर | - | नाजूक नक्षीकाम |
| कालिंदी | - | यमुना नदीचे नाव |
| कांता | - | पत्नी, बायको |
| कारभारीण | - | पत्नी, बायको |
| किंमत | - | दर, भाव, मान, प्रतिष्ठा |
| कुछ | - | काहीतरी थोडे |
| कुरूप | - | विद्रूप |
| कूच करणे | - | जाणे, निघणे |
| कुंज | - | बहरलेली बाग |
| केतकी | - | केवडा |
| कोडे | - | रहस्य, गुपित |
| कैरी | - | कच्चा आंबा |

## ख

| | | |
|---|---|---|
| खजिना | - | पाणी साठण्यासाठी बुरजात |
| केलेला हौद | - | धनसाठा |
| खबर | - | बातमी |
| खडक | - | पाषाण, पसरट दगड |
| खटला भरणे | - | पोलिसात तक्रार नोंदवणे |
| खासास्वारी | - | स्वतः, खुद्द |
| खुलणे | - | उठावदार दिसणे. |

## ग

| | | |
|---|---|---|
| गह्यरले | - | गहिवरले |
| गवंडी | - | बांधकाम करणारे |
| गर्जना | - | आरोळी |
| गर्द | - | दाट |
| गहाण | - | गरजेस पैसे घेण्यासाठी ठेवलेली मौल्यवान वस्तू |
| गाजी | - | पराक्रमी पुरुष |
| गाठुंड | - | गाठोडे |
| गिरिजा | - | पार्वतीचे एक नाव, हिमालय कन्या |
| गुरळी | - | चूळ |
| गोपहारी | - | गोपाळांची रांग |
| गोरक्षण | - | गाईंच्या रक्षणासाठी बांधलेली इमारत |
| गौरव | - | सन्मान, सत्कार |

## घ

| | | |
|---|---|---|
| घन | - | ढग |
| घुसणे | - | बळजबरीने प्रवेश करणे |

## च

| | | |
|---|---|---|
| चकविणे | - | फसविणे |
| चाहते | - | मानणारे |
| चाहूल | - | येत असल्याची जाणीव |
| चिरनिद्रा | - | कायमची झोप (मरण) |

## ज

| | | |
|---|---|---|
| जाणती मंडळी | - | ज्ञानी लोक, जाणकार |
| जीवन | - | आयुष्य, पाणी |

## ट

| | | |
|---|---|---|
| टक्क उघडणे | - | पूर्ण जागे होणे. |
| टाकी देयल | - | टाकून दिलेल्या |
| ट्रस्ट | - | विश्वस्त मंडळ |
| ट्रस्टी | - | विश्वस्त |

## ठ

| | | |
|---|---|---|
| ठाव | - | ठिकाण स्थळ |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## ड

डौलदार - ऐटदार

## त

तळे - तलाव

तसूभर - थोडेदेखील

तजवीज - सोय, व्यवस्था

तरंगणे - आकाशात फिरणे, पोहणे

तंतोतंत - अचूक

ताटी - झोपडीचे दार

तृप्ती - समाधान

## द

दडणे - लपणे

दशा - परिस्थिती, गत

दाखला - उदाहरण

दालन - कक्ष, विभाग

दिन - दिवस

देवाघरी जाणे - मरण पावणे

दैव - नशीब

## ध

धाक - दरारा, जरब

धायमोकलून रडणे - मोठ्याने रडणे

धोरण - अंदाज

## न

नळ - पाणी आणण्याचा भुयारी मार्ग

नटेश - शंकर

नरेश - राजा

नमाज - मुस्लीमांची प्रार्थना

निज - स्वतः

निकुंज - वेलींची बाग

नेटकेपणा - व्यवस्थितपणा

## प

पन्हं - कच्च्या कैरीपासून बनविलेले पेय

परवडी - प्रकार

पडसाद - प्रतिध्वनी

पक्के - ठाम, निश्चित

पळस्पे - कोकणातील एक गाव.

पाषाण - दगड,

पाथरवट - दगड घडविणारे (इमारतीसाठी)

पार्क - मोकळे मैदान, बाग

पात्र - भांडे, योग्य

पावेतो - पर्यंत

पाव्हणं - पाहुणे

प्रेमभावे - प्रेमाने

प्रतिभा - कलानिर्मितीचे सामर्थ्य

## भ

भरीसनं - भरून

भंडारा - महाप्रसाद

भावंड - भाऊ

भातुकली - लहानपाणी खेळला जाणारा मुलींचा खेळ (खोटा खोटा) स्वयंपाक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

भागला - दमला
भुतंग - भूतबाधित स्त्री
भुकेकू - भुकेलेल्याला

## म

मर्जी - इच्छा कृपा
मस्त - छान, माजलेला
मळलेली - रूळलेली
मनोरा - खालून वर निमुळता होत जाणारा पोकळ खांब
माथा - डोंगरटोकावरील स्पष्ट जागा
मोट - विहिरीतून पाणी काढण्याचे साधन, जे बैलांनी ओढले जाते.
मोहक - आकर्षक
मिथ्या - खोटे

## य

यदुपती - श्रीकृष्ण
योगी - योगविद्येचा अभ्यास केलेला

## र

राया - राजा
राखी - रक्षण कर, वाचव
रंगछटा - विविध रंगांचे दर्शन

## ल

लुब्ध होणे - मोहीत होणे

## व

वर्साचं - वर्षाचं
वरुचा - वरूण
वसुदेवनंदन - श्रीकृष्ण
वसतिगृह - राहण्याची व्यवस्था असलेले ठिकाण
वाढूळ - पुष्कळ, फार, भरपूर
वाटोळं - गोलाकार
वाळा - एक प्रकारचे सुगंधी गवत
वामदेव - एक वैदिक ऋषी
वाटेला लावणे - निरोप देणे
विसावा - विश्रांती
विश्वविक्रम - जागतीक पातळीवरील विशेष काम
वेडे - खुळे
वैकुंठ - विष्णूचे निवास स्थान

## श

शनिवारवाडा - पुण्यातील पेशव्यांचा वाडा
शहाळे - कोवळा नारळ
शील - चारित्र्य
शुक्रतारा - पहाटे उगवणारा एक ग्रह
शुक्र - व्यासाचा पुत्र, पोपट
शिल्पकला - दगडावरील कोरीव काम.

## स

सखया - मित्रा
सज्जा - इमारतीच्या बाहेरच्या बाजूला काढलेला कठडा.
सस्ती - स्वस्त
साद - हाक
सार्थक - सफलता
सा - सज्जन

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | | |
|---|---|---|---|
| साहेब | - मालक, परमेश्वर | हजारीमोगरा | - समुहाने उमललेली मोगऱ्याची फुले. |
| साज | - अलंकार दागिना | हिनई | - हिणवणे |
| सुगरण | - उत्तम स्वयंपाक करणारी | हिरीदाचा | - हृदयाचा |
| सुरश्रेणी | - देवतांची रांग | हिमचल | - हिमाचल पर्वत |
| सुवर्णाक्षर | - सोन्याची अक्षरे | हिंगणबेट | - खुरटी काटेरी वनस्पतींची झुडपे. |
| सुवासिक | - सुगंधीत | हेर | - जासूद, गुप्त बातमी काढणारा |
| सुरेख | - सुंदर | | |
| सिंहनाद | - सिंहाची गर्जना | | |
| सिक्षापणी | - शिकवण | | |
| सिंहरी | - सिंहाची गर्जना | | |
| सोवळे | - शुद्ध, पवित्र | | |
| संगीन | - दगडी, चिरेबंदी | | |
| संगे | - बरोबर, सह | | |
| स्तब्ध | - शांत. | | |

## क्ष

| | |
|---|---|
| क्षितिज | - जेथे आकाश जमिनीला टेकलेले आहे असे वाटते ती जागा |

## ह

| | |
|---|---|
| हळहळ | - दुःख |

## ज्ञ

| | |
|---|---|
| ज्ञानसाधना | - ज्ञान मिळविण्यासाठी प्रयत्न |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

❃❃❖❃❖❃❖❃❃

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED